आंदोलन


वर्ष १२| अंक ११ |मूल्य ₹२०/-

शाश्वत विकासासाठी

जून २०२१ | पृष्ठे ३६



मन:पूर्वक आदरांजली!



लोकशाहीचा महान ठेवा जनतेनी केली जनतेची सेवा

आंदोलन

शाश्वत विकासासाठी

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे मासिक संवाद माध्यम

शाश्वत विकास न्यासाचा उपक्रम

वर्ष बारावे, अंक अकरावा

जून २०२१ ✠ मूल्य रु. २०/-

जन आंदोलनाचा राष्ट्रीय समन्वय - मराठी संवाद माध्यमाचा अंक - वर्ष २५ अंक ६

कार्यालय : आंदोलन शाश्वत विकासासाठी, द्वारा केमिकल मजदूर सभा,२९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.

वार्षिक वर्गणी - व्यक्ती - रु. २५०/- संस्था - रु. ३००/-

१२ वर्षांची वर्गणी - व्यक्ती रु. २,५००/- संस्था - रु. ३,०००/-

• आपण एकाहून अधिक वर्षांसाठी वर्गणी भरू शकता. • चेक/ड्राफ्ट 'आंदोलन शाश्वत विकासासाठी' ह्या नावाने काढावा. • वर्गणी शक्यतो चेक/ड्राफ्टनेच पाठवावी • तसे शक्यच नसल्यास मनिऑर्डरने पाठवावी. • **चेक/ड्राफ्ट/मनीऑर्डर ठाण्याच्या पत्त्यावरच पाठवावी.**

संपादकीय

कुचकामी सरकारला पराभुत करण्यासाठी, जन आंदोलन हाच उपाय !

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संघाच्या मुशीत घडलेली भारतीय जनता पार्टी या देशातील आम जनतेच्या हिताचा कारभार कधीच करणार नाहीत, हे पुन्हा एकदा स्पष्टपणे समोर आलेले आहे. आहे तो पंतप्रधान कुचकामी ठरलाय तर दुसरा बदलून पहा, या म्हणण्यात काडीचाही अर्थ नाही. जगभर कोविड महामारीच्या पहिल्या लाटेचे संकट अचानक कोसळले. देशोदेशीच्या बहुसंख्य सरकारांनी त्याचा शहाणपणाने मुकाबला केला. दुसऱ्या लाटेच्या वेळी तर अनेक सरकारांनी कमालीची तयारी दाखवली. भारत सरकारने मात्र पहिली लाट आटोक्यात येताच कोविडला पळवून लावल्याची वृथा हाकाटी पिटली आणि आता तर देशाच्या अब्रुची लक्तरे पार जगाच्या वेशीवर टांगली. राजकीय, व्यावहारिक, वैज्ञानिक असे कोणतेच शहाणपण भारत सरकारने दाखवले नाही. कोविड आटोक्यात आणण्यासाठी लसीकरणाला महत्व देण्याऐवजी अनावश्यक अशा सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पाला अत्यावश्यक प्रकल्प घोषित करवून, सरकारच्या म्होरक्याने अक्षरश: कमरेचे सोडून डोक्याला बांधले.

अक्खा मार्च - एप्रिल महिनाभर, विधानसभा निवडणुकीत प्रचार गर्जना करत हिंडणारे देशाचे गृहमंत्री मे महिन्याच्या सुरुवातीसच निवडणुकीत निक्काल लागल्यानंतर तर गायबच झालेत. हे देशाचे गृहमंत्री असण्यापेक्षा भाजपाचे कुटील नेते असल्याबद्दल अधिक जागरुक आहेत. भाजपच्या वतीने विखारी प्रचार वेगाने साधण्यासाठी, यांनी हजारो व्हाट्स अप ग्रुप्स तयार केले असल्याची फुशारकी ते अनेकदा मारत असतात. या ग्रुप्सवरून अवघ्या काही मिनिटात देशभर कोणतीही खरी खोटी बातमी पसरवली जाते हेही त्यांनी अनेकदा सिद्ध करून दाखवले आहे. निवडणूक प्रचार बाजूला ठेवून देशातल्या कोविड महामारीमुळे त्रस्त जनतेस मदत करण्याचे घटनादत्त काम त्यांनी नाही केले. परंतु किमान त्यानंतर तरी या असंख्य ग्रुप्स वरून त्यांना कधी नव्हे ते महामारी ग्रस्त जनतेस मदत होईल अशी माहिती, वृत्त प्रसारित करता आले असते. हेल्प लाईन चालवता आली असती. मे महिना अखेरीस या दोघांनी दिल्लीत भाजपा आणि संघ नेत्यांसोबत बैठक घेतली. महामारी आटोक्यात आणण्या संदर्भात झालेल्या चुका मान्य करून त्या सुधारायच्या कशा यावर त्यात चर्चा झाली नाही तर, वर्षभरानंतर उत्तर प्रदेशमध्ये येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीआधी डॅमेज कंट्रोल कसे करायचे यावर तिथे चर्चा झाली ! थोडक्यात, संघाचे राजकारण रेटू इच्छिणाऱ्या नेत्यांना बिकट प्रसंगी किंवा अभूतपूर्व संकटाच्या वेळीही जनसामान्यांना मदत करू शकेल असे काम करावेसे वाटणेच शक्य नाही. उलट, अशा परिस्थितीतही पुढली निवडणूक कोणती कुनीति वापरून लढवायची, याचे आडाखेच त्यांना अधिक महत्त्वाचे, हेच त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

सरकार आणि सत्ताधारी पक्ष चालवणाऱ्या या दोन नेत्यांकडून हे सारे जन विरोधी कारनामे चुकून किंवा अज्ञानापोटी झालेले नसून संघाच्या सोची - समझी रणनीती नुसारच हे सारे घडत आहे. जन सेवेचा प्रचंड पुळका असल्याचे ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत भासवले जात असते त्या संघाने, कोविड संकट काळात सामान्य जनतेची इतकी परवड केली जात असतांनाही सत्ताधाऱ्यां बाबत ब्र ही न उच्चारणे, हे याचेच द्योतक आहे. संघाला आम हिंदूंच्या हिताचा जराही पुळका नाही. महामारीच्या पहिल्या लाटेच्या वेळी कष्टकरी कामगारांची परवड सरकारने केली. दुसऱ्या लाटेत तर इस्पितळे, प्राणवायू, औषधे या साऱ्याची योग्य आणि वेळेवर सोय न झाल्याने निरपराध भारतीय नागरिक जीवानिशी मारले गेले. यात लोकसंख्येच्या प्रमाणात बहुसंख्य हिंदूंचेही अतोनात नुकसान झाले. तथाकथित हिंदू हितवादी सरकारने हा जो हिंदूंवर अन्याय केला, त्याबाबत संघाने जराही आवाज उठवला नाही. सरकारचे कान उपटले नाहीत. या देशातील आम जनता, सर्वसाधारण हिंदू धर्मीय - गोर गरीब, दलित - आदिवासी आणि अन्य मागासवर्गीय यांच्या कल्याणाशी संघाचा दुरान्वयानेही संबंध नाही, हे या महा भयानक

संकटाच्या काळात, पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. अर्थात, जनताही जाणू लागली आहे. नुकत्याच झालेल्या अनेक विधानसभा आणि उत्तर प्रदेशातील पंचायत निवडणुकीत भाजपाने सपाटून मार खाल्ला आहे. एक परीने केंद्राच्या नाकर्तेपणा संदर्भात जनतेने आपली नाराजी मतपेटीतून नोंदवली आहे. अर्थात, त्यातून आपल्या चुकांबाबत आत्मपरीक्षण करून, जनहिताचे राजकारण करणे संघ-भाजपच्या डोक्यातही शिरणे शक्य नाही! उलट, आपली कुटील यंत्रणा कुठे कमी पडली याचा शोध घेऊन, अधिक विध्वंसक राजकारण खेळण्याची तयारी करण्याची शक्यता अधिक!

बिकट प्रसंगी देशाचा तथाकथित प्रधान सेवक अशा रीतीने कुचकामी आणि केवळ पक्षीय स्वार्थात व्यग्र असतांना, विविध जनसेवी पदांवर काम करणारे - त्यापैकी काही काही जण तर विनावेतन वा अत्यंत तुटपुंज्या वेतनावर काम करीत असतानाही - सामान्य जनातील असंख्य नि:स्वार्थी आणि कर्तबगार सहकारी अत्यंत धीराने आणि जबाबदारीने, नेटाने आणि निष्ठेने, मानवतावादी दृष्टिकोनातून आणि स्वयंस्फूर्तीने कार्यरत राहिले आणि जनतेच्या कामी आले. सफाई कर्मचारी, इस्पितळ कर्मचारी, नर्सेस, वॉर्ड कर्मचारी, डॉक्टर्स, पोलीस, पत्रकार, सरकारी कर्मचारी, वीज वितरण कर्मचारी ... अशा असंख्य समाज घटकांनी सिद्ध करून दाखवले की, **लोकशाहीचा महान ठेवा - जनतेने केली जनतेची सेवा!**

अशावेळी गरज आहे संघाच्या या ढोंगबाजीच्या राजकारणाला तितक्याच समर्थपणे निरस्त करणाऱ्या धर्मनिरपेक्ष आणि जन-सामान्यांचे हित साधू पाहणाऱ्या राजकारणाची! अर्थात राजकीय परिवर्तने एका दिवसात घडून येत नाहीत. यापूर्वी झालेले सत्ता बदल हे प्रत्यक्ष निवडणुकां आधी चाललेल्या जन आंदोलनांनी निर्माण केलेल्या वातावरणात घडून आलेले आहेत, हे याठिकाणी आवर्जून लक्षात ठेवायला हवे. सीएए - एनआरसी - नागरिकता संशोधन कायद्या- विरोधात झालेल्या उठावात आणि त्यानंतर आता ६ महिन्यांपासून दिल्लीच्या वेशीवर ठाण मांडून बसलेल्या देशभरातील शेतकरी-कष्टकऱ्यांनी चालवलेल्या अभूतपूर्व आंदोलनात तशीच ऊर्जा ठासून भरलेली आहे. गत २६ मे रोजी संयुक्त किसान मोर्चाच्या आवाहनानुसार, देशभरातील शेतकरी-शेतमजूर-कामगार-विद्यार्थी-महिला आदी विविध जाती धर्मातील जनतेने आपली ताकद पुन्हा एकदा दाखवून दिली आहे. शेतकरी आंदोलनास ६ महिने पूर्ण होत असतानाच भाजप कुशासनाला ७ वर्षे पूर्ण होत असताना या जनतंत्र विरोधी, निजीकरण आणि कंपनीकरणवादी सत्तेच्या तसेच शेतकरी विरोधी ३ कायदे व श्रमिक विरोधी ४ कोड जबरदस्तीने लादल्याच्या निषेधार्थ देशभर उग्र आंदोलन छेडण्यात आले. घरा घरांवर काळे झेंडे, जिल्हाधिकारी – तहसील कार्यालयांसमोर निदर्शने – निवेदने असे कार्यक्रम झाले. त्याच दिवशी अनेक वस्त्या–गावे-पाड्यांमधून बुद्ध पूर्णिमा साजरी करताना बुद्ध प्रतिमा पूजन करण्यात आले. देशभर पसरलेला अंधकार दूर व्हावा, आपसातील भेदभाव आणि विषमता नष्ट व्हावी, अशा प्रार्थना करण्यात आल्या. शांती, अहिंसा, समता आणि मानवता या मूल्यांचा प्रकाश आत्मसात करण्याचा निर्धार करण्यात आला. किसान, रोजगार, लोकतंत्र आणि संविधान वाचवण्याचा संकल्प घेण्यात आला. मात्र आंदोलकांच्या न्याय्य मागण्या मंजूर करण्याचे निर्देश केंद्र सरकारला देण्याऐवजी, संघाने पुन्हा एकदा आपली सोची समझी कुटील नीती सुरु केली आहे. संघाचे पिल्लु असणाऱ्या भारतीय किसान संघाने २६ मेच्या आंदोलनाला विरोध केला. आंदोलकांवर देशद्रोही, परदेशी निधी मिळवणारे, शेतकरी हिताच्या विरोधात काम करणारे असे अत्यंत खोटारडे आरोप केले. सरकारने आंदोलकांशी चर्चा न करता आमच्याशीच चर्चा करावी, अशी मागणीही केली. सत्य आणि न्यायाची लढाईही विद्यमान केंद्र सरकारच्या काळात किती अवघड बनली आहे! अर्थात, शेतकरी आंदोलक आणि त्याचे देशभरातील समर्थक या बनवाबनाविला पुरून उरतील, यात शंकाच नाही!

ज्याप्रमाणे कोविड संसर्गाविरुद्ध सरकार - प्रशासन कुचकामी ठरत असताना जनसामान्यानी अतुलनीय कामगिरी करुन दाखवली आहे, तशीच कामगिरी राजकीय पटलावर करुन दाखवण्याची जबाबदारी आम जनता योग्य वेळी पार पाडेल! याकरिता आवश्यकता आहे सतत जागरुक राहण्याची! संघाच्या लबाड्या उघड्या पाडत रहाण्याची!! जनतेचा आवाज बुलंद करत रहाण्याची!!!

संजय मं. गो., कार्यकारी संपादक

विशेष

यानंतर प्रश्न तुमच्या माणुसकीचा आहे!

अमेय तिरोडकर

तुम्ही राजकीयदृष्ट्या कोणत्या विचारांचे आहात याला आता काहीच देणं-घेणं नाही. तुम्ही कोणीही असू शकता. संघ कार्यकर्ते, हिंदुत्ववादी. कम्युनिस्ट किंवा समाजवादी. काँग्रेसी किंवा आंबेडकरवादी. कोणीही. पण हे सगळं असण्याच्या आधी असता तुम्ही माणूस. आणि त्या माणुसपणाशी तुमचं काही नातं आहे की नाही, हा यानंतर प्रश्न असणार आहे.

एक अक्षरही मागे ठेवून बोलायची गरज नाही. हे आता सूर्यप्रकाशापेक्षा स्पष्ट आहे. मोदी सरकारने कोरोना हाताळणीत भयंकर चुका करून देशाला दु:ख, वेदना, तडफड, अन्याय आणि अभावाच्या खाईत लोटले आहे. ही अपरिमित हानी आहे. भारतातल्या हानीचे खरे आकडे समोर येत नाहीत, असं भारतीय आणि जागतिक माध्यमांचंदेखील म्हणणं आहे. पण म्हणून झालेलं हे अतिप्रचंड नुकसान लपून राहत नाही. आसमंतात भरलेलं हे नैराश्य आणि पराकोटीची भीती त्या आकड्यांच्या दाहकतेपेक्षा मोठी आणि निर्णायक आहे. मोदी सरकारच्या स्पष्ट अपयशाचा तो पुरावा आहे. हे मी कधीही लपवून ठेवलं नाही की मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघप्रणीत सांस्कृतिक राष्ट्रवादाचा स्पष्ट विरोधक आहे. मला ही विचारधारा मान्य नाही. पण या देशातल्या बहुसंख्य लोकांनी एकदा नव्हे तर सतत दोन वेळा संघप्रणीत राजकीय विचारांना साथ दिली. मला हे अर्ग्युमेंट कधीही मान्य नसतं की, फक्त ३६ टक्के लोकांनीच साथ दिली आणि बाकी ६४ टक्के लोकांनी दिली नाही. हे बोगस आहे. बहुपक्षीय लोकशाहीत हे ३६ टक्के निर्णायक असतात. आणि निर्णायक जनता ज्यांच्यासोबत असते तो विजयी असतो. मोदी सरकार तब्बल दोन वेळा या अतिप्रचंड देशात अशा निर्विवादपणे निवडून आलेले आहे. लोकशाहीचा हा कौल अमान्य करणे म्हणजे आत्मवंचना करणे आहे.

हे सरकार निवडून आले त्याला आता या मे महिन्यात एकूण ७ वर्षं होतील. ही ७ वर्षं भारतीय इतिहासातील अंधारयुग आहे. अंधार अज्ञानाचा, अंधार अविचारांचा आणि अन्यायाचा, अंधार अमानवी वृत्तींचा. आणि या सार्वत्रिक अंधाराला रेलून उभे असलेलं हे मोदी सरकार. या तमाम अवगुणांचे परमोच्च प्रकटीकरण या कोरोना काळात झालंय. आणि देश या हतबलतेच्या वळणावर येऊन उभा ठाकला. गेल्या वर्षी पण कोरोनाची लाट होती. तेव्हाही आजचे सगळे प्रश्न समोर आलेले. ऑक्सिजन, इंजेक्शन, बेड, व्हेंटिलेटर्स, आयसीयू बेड, टोसिलिझुमॅब वगैरे वगैरे. सगळ्यांची टंचाई. पण गेल्या वर्षी लाट कशीबशी निभावली आणि मोदी सरकारने आपली पाठ थोपटून घ्यायला सुरुवात केली. दावोसच्या परिषदेत व्हिडीओ कॉन्फरन्सवर भाषण करताना मोदींनी दिमाखात सांगितलं की भारताने कोरोनावर विजय मिळवला आहे. खरंतर तेव्हा युरोपात कोरोनाची दुसरी लाट नुकतीच ओसरत होती. हे पहिल्या लाटेतच स्पष्ट झालं होतं की, भारत कोरोना प्रसारणाच्या बाबतीत युरोपच्या दीड ते दोन महिने मागे असतो. याचा अर्थ फेब्रुवारी महिन्यात मोदी सरकारने स्वत:ची पाठ थोपटून घेण्यापेक्षा आपण दुसऱ्या लाटेत काय करणार आहोत, हे सांगणं गरजेचं होतं. इतकंच नाही तर आता हेही समोर आलंय की, यंदा फेब्रुवारी महिन्यात मोदी सरकारला आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींनी सांगितलं होतं की, कोरोनाची मोठी लाट येऊ घातली आहे. तरीही काहीही कार्यवाही झाली नाही. कारण संपूर्ण मोदी सरकारसमोर कोरोनाला हरवणं, हे उद्दिष्ट नव्हतं. त्यांचं ध्येय होतं पश्चिम बंगाल जिंकणं.

अखेर कोरोनाची दुसरी लाट आली. आपण बघतोय देशाची काय अवस्था आहे. सुरतमध्ये स्मशानात इतकी प्रेतं जाळली गेली की तिथली चिमणी वितळली. गाझियाबादमध्ये फुटपाथवर प्रेतं जाळायची वेळ आली. दिल्लीमध्ये लोकांना हॉस्पिटलमध्ये साधा बेड मिळत नाही. ही वेळ आली की रस्त्यावर, फुटपाथवर लोकांना ऑक्सिजन लावावा लागतोय. लखनौमध्ये विलगीकरणात म्हणून असलेलं एक कुटुंब मरण पावलं होतं.

शेजारच्यांना त्यांच्या प्रेतांचा वास येऊ लागला तेव्हा कळलं की ते मरण पावलं. बंगळुरूमध्ये स्मशानाच्या बाहेर बोर्ड लागलाय–हाऊसफुल्ल म्हणून. हे काय आहे? हे कुणाचं अपयश आहे? हे फक्त आणि फक्त अकार्यक्षम, अहंकारी आणि असंवेदनशील अशा मोदी सरकारचं कर्तृत्व आहे का?

कारण मोदी सरकारने तज्ज्ञ मंडळींचं ऐकून दुसऱ्या लाटेची तयारी करायला घ्यायला हवी होती. सर्वात प्रथम म्हणजे ऑक्सिजनची सोय लावायला हवी होती. गेल्या वर्षभरात मोदी सरकारने तब्बल ९ हजार मेट्रिक टन ऑक्सिजन निर्यात केला. हाच ऑक्सिजन देशातल्या हॉस्पिटलला लागेल याचं नियोजन करून देशात ठेवायला हवा होता. आज आपण रोजच्या रोज बातम्या वाचतोय की ऑक्सिजनअभावी तडफडून रुग्णांचा मृत्यू. अलाहाबाद न्यायालयाने त्याला नरसंहाराची उपमा दिली. इतकी भीषण स्थिती याआधी देशात कधीच नव्हती. मोदी सरकारचं घनघोर अपयश इथेच थांबत नाही. मोदी सरकारने तब्बल ६ कोटी लसी जगभरात निर्यात केल्या. या देशाची लसींची गरज आहे १३० कोटी. प्रत्येकी दोन डोस म्हणजे २६० कोटी. इतक्या प्रचंड लोकसंख्येची लसींची गरज आधी भागवणं हे कुठल्याही सरकारचं शहाणपणाचं धोरण असतं. पण सरकारला नेमकं त्याचंच वावडं आहे. देशात दुसरी लाट येतेय ही सूचना तज्ज्ञ मंडळी देत असतानाही देशातल्या नागरिकांचं लसीकरण करायचं सोडून मोदी सरकार निर्यात करीत बसलं. एवढ्यावर थांबले नाहीत. जगात ज्या इतर लसी बनत आहेत त्यांना भारतात परवानगी देऊन ट्रायल सुरू करायला हव्या होत्या. म्हणजे त्यांनाही भारतात बोलावून एवढ्या अवाढव्य लोकसंख्येला असणारी लसींची गरज भागवायला सुरुवात झाली असती. पण तेही झालं नाही. बाहेरच्या लसींना दुसरी लाट येऊन आदळल्यावर परवानगी दिली. आता साहजिकच ट्रायलपासून किंमत ठरवण्यापर्यंतच्या सगळ्या प्रक्रियेला वेळ लागणार. पण तोवर हजारो भारतीयांना आपल्या जिवाला मुकावं लागलं.

आजवर भारतात अनेक साथी आल्या. अगदी घटसर्प ते कॉलरा, डेंग्यू ते पोलिओ आणि इतर. जगात ज्या अनेक कारणांसाठी भारताबद्दल आदराने बोललं जातं त्यात ह्या आजारांवर मात करताना भारताने घेतलेल्या मानवी भूमिकेबद्दल बोललं जातं. आपल्याकडे आजवर सर्व लसी सर्व नागरिकांना मोफत दिल्या गेल्या. हे उपकार नव्हते. ती देश म्हणून भूमिका होती. सर्व नागरिकांच्या आरोग्याची देशाच्या सरकारांना असलेली काळजी होती. फक्त मोदी सरकार हे असं एकमेव सरकार आहे की ज्याने हा मुद्दा राज्यांवर ढकलून दिला आणि त्यातही गोंधळ घालून ठेवला. सर्व नागरिकांना मोफत लस देण्याबद्दल तब्बल ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद २०२०-२१ च्या देशाच्या बजेटमध्ये केली आहे. पण मोदी सरकारने लसींच्या किमती करायला कंपन्यांना परवानगी दिली आणि राज्यांना त्यांच्याशी थेट व्यवहार करायला सांगितलं. आज जो देशभर गोंधळ उडालेला दिसतो तो या व्यापारकेंद्रित धोरणामुळे. जे लसींचं झालं, जे ऑक्सिजनचं झालं तेच व्हेंटिलेटरचं झालं. तेच आयसीयू बेड बाबतीत झालं. तेच रेमडेसिवीर इंजेक्शनबाबतीत होतंय. त्याहीपेक्षा भयंकर म्हणजे ह्या सगळ्या साधनांच्या वाटपात त्या त्या राज्यात सत्तेत कोण आहे, ते बघून वाटप होतंय. भाजपा किंवा भाजपाधार्जिणे सरकार असेल तर सगळ्या गोष्टी चांगल्या प्रमाणात मिळतात. पण नसतील तर मात्र तुमचं काही खरं नाही. विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्री, आरोग्यमंत्र्यांनी तुमच्या पाया पडतो पण आम्हाला साधनं द्या, ऑक्सिजन द्या, लसी द्या, असं जाहीरपणे म्हणूनसुद्धा मोदी सरकार हलत नाही. त्यांना पाझर फुटत नाही. न्यायाने वागवत नाही. याला अमानुष नाही तर काय म्हणावं? हे असं का झालं? जोवर आपण हे समजून घेणार नाही तोवर आपण मोदी सरकारच्या या विक्राळ अंधाराला जाणू शकणार नाही.

मोदी सरकार पहिल्या दिवसापासून विज्ञानविरोधी आहे. हे सरकार पहिल्या दिवसापासून समताविरोधी आहे. आणि त्याचसोबत हे सरकार न्यायाच्या संकल्पनेच्याही विरोधात आहे. याच सरकारच्या काळात १ हजारहून अधिक वैज्ञानिकांनी सरकारने वैज्ञानिक संस्थांची गळचेपी थांबवावी म्हणून पत्रं लिहिली आहेत. जर यांचा विज्ञानावर विश्वास असता तर सरकार म्हणून त्यांनी कोरोनाचा विषय गांभीर्याने हाताळला असता. रामदेवसारख्या माणसाने काढलेल्या एका सिरपला हे कोरोनावर औषध म्हणून उद्घाटन करायला देशाचे आरोग्यमंत्री हर्षवर्धन

गेले होते. उच्च न्यायालयाने शेवटी सांगितलं की हे कोरोनावरील औषध नाही. याने कोरोना बरा होत नाही. त्याची तीव्रता वाढू नये म्हणून असलेल्या अनेक उपलब्ध पर्यायांपैकी हे एक आहे. मला सांगा, ज्यांची विज्ञानावर श्रद्धा आणि विश्वास आहे त्या कुणीही असल्या गोष्टींना पाठिंबा दिला असता काय ? देशातल्या करोडो नागरिकांची फसवणूक करण्याचाच हा प्रकार नाही काय ? याच हर्षवर्धन यांनी आणखी एक स्टेटमेंट केलं की सर्वांनाच लस घ्यायला हवी असं काही नाही. हे तर तळपायाची आग मस्तकात जावी असं आहे. सर्व वयाच्या लोकांना कोरोना होतो आहे. अशा काळात कुठल्या आधारे लस कुणाला द्यावी आणि कुणाला नाही हे ठरवणार ? इतकं अशास्त्रीय, इतकं गंभीर विधान केलं म्हणून दुसऱ्या कुठल्याही देशात या माणसाला राजीनामा द्यावा लागला असता. असं काही झालं आपल्याकडे ? मला सांगा, इथे रोज किमान साडेतीन हजार लोक जातायत. चार लाख लोक पॉझिटिव्ह झालेले सापडत आहेत. जगात इतक्या प्रचंड प्रमाणात दर दिवशी पेशंट सापडले नाहीत की मृत्यूही झालेले नाहीत. अशा स्थितीत आपल्या या अपयशाची जबाबदारी केंद्राने स्वीकारली काय ? असं एकदा तरी म्हटलं काय की आमची चूक झाली आहे ? ही जबाबदारी का घेतली जात नाही ? कारण मी मघाशी म्हटल्याप्रमाणे मोदी सरकार न्यायाच्या विरोधात आहे. आज त्या कोट्यवधी नागरिकांवर हा अन्याय झालेला आहे की, त्यांना आपल्या नातेवाइकांसाठी धडपड करावी लागत आहे. त्या जीव गमावलेल्या प्रत्येकाची जगण्याची संधी हिरावून घेतली आहे. कोणी ? मोदी सरकारच्या नियोजनशून्य कारभाराने. हा त्या मृतांवर, त्यांच्या नातेवाइकांवर क्रूर अन्याय आहे. त्याची जबाबदारी मोदी सरकारला स्वीकारायला नको काय ?

अरे, २००८ ला जेव्हा २६/११ हल्ला झाला तेव्हा दिवसातून तीन वेळा कपडे बदलले म्हणून तेव्हाचे गृहमंत्री शिवराज पाटील यांना राजीनामा द्यावा लागला. कपडे बदलले म्हणून राजीनामा झाला आहे या देशात. मग अशा स्थितीत तर ह्या अभूतपूर्व गोंधळाची, त्रासाची, दु:खाची, वेदनांची जबाबदारी स्वीकारून हे अख्खं सरकार पायउतार व्हायला पाहिजे. लोकांचा हा संताप, लोकांची ही भावना ट्विटर आणि फेसबुकवर Resign Modi हा जेव्हा ट्रेंड झाला तेव्हा दिसली. फेसबुकने तर हा ट्रेंड दडपून टाकला. लोकांच्या भावना दडपून टाकल्या. संताप दाबून टाकायचा प्रयत्न केला. हे कुणाच्या सांगण्यावरून केलं असेल ते वेगळं सांगायची गरज आहे काय ? या देशाची वाताहात व्हावी अशी भयंकर चूक केल्यावरही ती दडपून टाकायचा प्रयत्न सुरू आहे. उत्तर प्रदेशमध्ये सोशल मीडियावरून ऑक्सिजन मागितला तरी गुन्हे दाखल झालेत, असं तिथले पत्रकार सांगत आहेत. हे न्यायाचे राज्य नाही. ही लोकशाही नाही. लोकांना श्वासही धड घेऊ द्यायचा नाही आणि त्याबद्दल बोलूही द्यायचं नाही, हे भयंकर आहे. जितके हे अपयश आपल्याला अस्वस्थ करणारं आहे तितकीच दमनशाही आपली कोंडी करणारी आहे. ही वैचारिक दमनशाही नाही. विरोधी विचारांच्या लोकांची कोंडी नाही. तर ऑक्सिजन, लस, इंजेक्शन, बेड मागणा-या हतबल माणसांची ही कोंडी आहे. ज्याला हृदय आहे तो कुणीही असो, ह्या वेदना बघून रडेल. त्याचं जगणं विदीर्ण झालंय, असं त्याला वाटेल.

म्हणून सांगतो, यानंतर प्रश्न तुमच्या माणुसकीचा आहे. तुम्ही कोणीही असाल. कुठल्याही राजकीय विचारांचे असाल. पण त्याआधी तुम्ही माणूस असता. तुम्ही ह्या काळात सामान्य माणसांच्या आकांताच्या बाजूने उभे राहणार की नाही, हे ठरवा. आज सामान्य माणसांवर ज्यांच्या अकार्यक्षमतेमुळे ही वेळ आलीय त्यांच्या विरोधात पाय रोवून उभे राहणार की नाही, हे ठरवा. त्या लाखो नागरिकांच्या डोळ्यांत बघा. हतबलतेची, असहाय्यता, पराभवाची ही दीनवाणी कहाणी त्या डोळ्यांत दिसेल. तुमच्यातल्या माणुसपणाला साद घालायला हे डोळे पुरेसे नाहीत काय ? त्या करोडो सामान्य माणसांचं हे हरवलेपण ह्या भेसूर अंधाराला आव्हान द्यायला तुम्हाला सांगत नाही काय ? आज प्रश्न तुम्ही माणूस होऊन या सामान्य माणसांच्या सोबत उभे राहणार की नाही, हा आहे. रोज रात्री थकून भागून जेव्हा तुम्ही झोपी जाल तेव्हा तुमच्यातल्या माणसाने ह्या सामान्य माणसांशी, त्यांच्या वेदनांशी जोडून घेतलं नसेल तर स्वत:च स्वत:ला काय उत्तर द्याल, हे ठरवा. यानंतर प्रश्न तुम्ही स्वत:च स्वत:शी नजर मिळवू शकणार की नाही, हा आहे.

(महाराष्ट्र दिनमानच्या सौजन्याने)

ameytirodkar@gmail.com

विशेष

करोनावर मात करायची, तर हिरवाई हेच खरे औषध

डॉ. नागेश टेकाळे

करोनासारखी साथ नकारात्मकता तयार करते. ती शरीराच्या प्रतिकार शक्तीवर सतत घाव घालत असते. हा साथीचा विषाणू यापुढे पूर्णपणे नष्ट होणे कठीण आहे. त्यावर मात करायची, तर ती सकारात्मक विचारशैलीमधून नैसर्गिक प्रतिकार शक्ती वाढवून होऊ शकते. त्यासाठी रोज थोडा वेळ निसर्गासाठी देणे गरजेचे आहे... जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सांगताहेत एक उद्यानविद्या आणि वृक्षविज्ञानाचे अभ्यासक.

शहरे ही वाढत नसून फुगत आहेत. उंच टोलेजंग इमारती, चार, सहा, आठ पदरी रस्ते, त्यावर धावणारी लाखो वाहने, या मानवी कुंचल्याने काढलेल्या चित्रात निसर्गाचा हिरवा ठिपका शोधणे कठीण झाले आहे. असे असूनही सिमेंट आणि विटांच्या या जंगलात करोनाने बंदिस्त केलेल्या माणसांना शहरामधील काही हरित जागांनी अनपेक्षितपणे खरा आनंद आणि मन:शांती मिळवून दिली. त्यांचा मानसिक तणाव कमी केला आणि हे सर्व एक पैसाही खर्च न करता, हे जगामधील अनेक शहरांनी अनुभवलेले अधोरेखित सत्य आहे.

उत्क्रांतीचे घड्याळ पाहताना आपल्या लक्षात येते, की जैव विविधता ही तीन लाख वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात आहे; पण सर्वांत प्राचीन शहराचा इतिहास जेमतेम सहा हजार वर्षांचा आहे. संयुक्त राष्ट्राच्या लोकसंख्या विभागाच्या २०११च्या अहवालानुसार, मनुष्य हा एक शहरी प्राणी असून, २०५०पर्यंत पृथ्वीवरील ७० टक्के माणसे फक्त शहरात राहणारीच असतील. हे त्यांचे स्थलांतर ग्रामीण भागामधील समृद्ध निसर्ग संपत्तीकडून शहराकडे झाले आहे; कारण या प्रत्येकास स्थलांतरापूर्वी निसर्ग आणि समृद्ध जैवविविधतेचे आकर्षण होते. १९८४ मध्ये प्रा. एडवर्ड ओ. विल्सन या जैवविज्ञान अभ्यासकाने 'बायोफिलीया' नावाने एक गृहितक मांडले होते. यामागे त्यांची भूमिका अशी होती, की माणूस आणि त्याच्या पूर्वजांच्या मेंदूची जडणघडण ही हजारो वर्षांपूर्वी सभोवती असलेल्या सुदृढ पर्यावरण, म्हणजे वृक्ष, वेली, प्राणी, वाहत्या नद्या, तलाव, झरे, गवताळ कुरणे यांच्या सहवासात होऊन, त्या अनुषंगाने विकसित झाली आहे. त्यांचे ठसे आजही तसेच त्याच्या मेंदूत कायम आहेत. म्हणूनच शहरात कुठे डेरेदार वृक्ष, हिरवळ, सुदृढ निसर्ग आढळला, की मेंदूच्या इशाऱ्यानुसार आपली पावले तिकडे आपोआप वळतात. विल्सन म्हणतात, 'मेंदूमधील या स्मरण ठशामुळे निसर्ग सहवासाचा आपणास जास्त आनंद मिळतो.'

विल्सन यांच्या गृहितकामधील विचार पटणारे असोत अथवा नसोत. संशोधनाने हे मात्र सिद्ध केले आहे, की निसर्ग सहवासामुळे फक्त शारीरिक स्वास्थ्यच उत्तम होत नाही, तर मानसिक स्वास्थ्यही सुधारत जाते. शरीराच्या चयापचयाशी जोडलेल्या सर्व आजारांचे उगमस्थान हे आहाराबरोबर आपल्या मानसिक आरोग्याशी निगडीत असते. मनाचे संतुलन बिघडणे, चिंता करणे, स्वभावाच्या नकारात्मक लहरींना व्यक्तीचे मानसिक अनारोग्य जास्त जबाबदार असते. निसर्गाचे सान्निध्य ताणतणाव, नकारात्मक विचार निष्क्रिय तर करतेच; पण सकारात्मक विचारांना प्रोत्साहित करून, निसर्गाबद्दलचे प्रेम वाढविते.

इंग्लडमधील शेटलँड या दुर्गम बेटावर डॉक्टरांनी मानसिक संतुलन, ताणतणाव; तसेच हृदयविकार आणि मधुमेही रुग्णांना निसर्ग सहवासात फिरणे, पक्षी निरीक्षण, एकत्र राहणे, एकत्र आहार, हिरवळीचा आनंद घेणे अशा एकंदरीत २८ निसर्गोपचार पद्धती २०१८पासून सुरू केल्या. यात विविध प्रकारचे बागकाम, कुंडीत झाडे लावणे, त्यांना नेमाने पाणी घालणे, या रोपट्यांची नीट काळजी घेणे, त्याचबरोबर स्वत:चे निसर्गस्नान यांचा अंतर्भाव आहे. या अशा वृक्ष आणि इतर लहान-मोठ्या वनस्पतींमुळे, रुग्णांच्या विविध आजारांवर सहज नियंत्रण मिळवता येते, हे यातून सिद्ध झाले. प्रश्न असा आहे, की निसर्ग सहवास आणि अशा साध्या-सोप्या उपचार पद्धतींसाठी अशा एवढ्या दूर निर्जन बेटावरच जायला हवे काय ? सर्वांना ते परवडेल का ? उत्तर निश्चितच 'नाही' असेच आहे. यास पर्याय म्हणून मग, वाढत्या शहरांमध्ये अशा निसर्गाला प्राधान्याने

(पान १५ वर)

आदरांजली

हिमालय पोरका झाला

सुनील तांबे

सुंदरलाल बहुगुणा यांचं कोविडमुळे वयाच्या ९४ वर्षी निधन झालं. उत्तराखंडातील चिपको आंदोलन आणि टेहरी धरणाच्या विरोधात त्यांनी केलेलं आंदोलन यामुळे ते कायम स्मरणात राहातील.

९ जानेवारी १९२७ रोजी सुंदरलाल बहुगुणा यांचा जन्म झाला. म. गांधीजींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य आंदोलनात ते सहभागी झाले होते. उत्तराखंडातील अस्पृश्यतेच्या विरोधात त्यांनी लढा दिला होता. विवाहानंतर खेड्यामध्ये आश्रम स्थापन करून राह्यचं या अटीवर त्यांनी विमला यांच्याशी विवाह केला. १९६५ ते १९७० उत्तराखंडात महिलांनी उभ्या केलेल्या दारू हटाव मोहिमेचे ते प्रणेते होते. हिमालयातील महाकाय विकास प्रकल्पांमुळे होणारी निसर्ग आणि समाजजीवनाच्या हानीची पाहणी करण्यासाठी १९८१ ते १९८३ या काळात त्यांनी सुमारे पाच हजार किलोमीटर्सची पदयात्रा केली. या यात्रेला देशात आणि देशाबाहेर मोठा प्रतिसाद मिळाला. तत्कालीन पंतप्रधान, श्रीमती इंदिरा गांधी यांनी उत्तराखंडातील वृक्षतोडीवर १५ वर्षांची बंदी घालण्याची घोषणा केली.

पाश्चात्य देशांमधील आधुनिक पर्यावरण चळवळीचा आरंभ राचेल कार्सन यांच्या सायलेंट स्प्रिंग या पुस्तकाने झाला. हे पुस्तक १९६२ साली प्रकाशित झालं. या पुस्तकाच्या प्रेरणेने उभ्या राह्यलेल्या पर्यावरण रक्षणाच्या आंदोलकांचा पर्यावरणाशी, निसर्गाशी जैव संबंध नव्हता. १९७० च्या दशकात उभं राह्यलेलं चिपको आंदोलन पूर्णपणे वेगळं होतं. निसर्ग आणि पर्यावरण यांच्यावर आमचं जीवन अवलंबून आहे म्हणून झाडं तोडायची असतील तर प्रथम आमच्यावर कुऱ्हाड चालवा असा अभिनव अहिंसक कार्यक्रम चिपको आंदोलनाने दिला. 'इकॉलॉजी इज पर्मनंट इकॉनॉमी' या चार शब्दांत आंदोलनाचं मर्म पकडणारी घोषणा, सुंदरलाल बहुगुणा यांनी दिली. या आंदोलनात ग्रामीण भागातील महिला आघाडीवर होत्या. या सर्व कारणांमुळे जगाचं लक्ष या आंदोलनाकडे वेधलं गेलं. पर्यावरण, वनसंवर्धन, स्थानिक समूहांचे हक्क वा अधिकार, पर्यायी विकासनीती असे अनेक धोरणात्मक विषय या आंदोलनामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर चर्चेचे बनले.

हिमालयाची पर्वतरांग काश्मीरपासून अरुणाचल प्रदेशापर्यंत आहे. भारतीय भूखंड युरेशियाच्या भूखंडाच्या खाली सरकत असल्याने जगातील उत्तुंग पर्वतरांग निर्माण झाली. त्यामुळे तिबेटचं पठार वर उचललं गेलं. लाखो वर्षं सुरु असलेल्या या प्रक्रियेमुळे सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्रा या तीन प्रमुख नद्या व त्यांच्या उपनद्या निर्माण झाल्या. हजारो वर्षं त्यांनी वाहून आणलेल्या गाळामुळे पंजाब, सिंध, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल येथील सुपीक गाळाची जमीन निर्माण झाली. आजही भारतीय भूखंड युरेशियाच्या खाली घुसतो आहे. त्यामुळे हिमालयाची उंची वाढत आहे. या कारणामुळे संपूर्ण हिमालय हे भूकंप प्रवण क्षेत्र आहे. भूकंप, बर्फाची वादळं, भूस्खलन, मातीची धूप, जंगलात लागणारे वणवे, पूर ही या प्रक्रियेची दृश्य रुपं आहेत. यापैकी भूकंप वगळता इतर सर्व परिणामांना आधुनिक विकासाचा कार्यक्रम जबाबदार आहे. जंगलतोड, रस्ते, धरणं, बंधारे, बोगदे, जलविद्युत प्रकल्पांमुळे हिमालयातील पर्यावरणाचा समतोल वेगाने ढासळतो आहे.

७ फेब्रुवारी २०२१ रोजी नंदादेवी पर्वतावरून बर्फ, गोठलेली चिखल आणि दगड यांचा प्रचंड मोठा तुकडा सुमारे पाच हजार मीटर्स खाली कोसळला. त्यामुळे ऋषी गंगेची उपनदी असलेल्या नदीत कृत्रिम तलाव निर्माण झाला. हा तलाव फुटल्याने उत्तराखंडातील गावांमध्ये पूर आला. त्यामुळे एक विद्युत निर्मिती प्रकल्पही वाहून गेला. चिपको आंदोलनाच्या नेत्या गौरादेवी, यांचं गावही या पुरात वाहून गेलं. या पुराने झालेली जिवीतवित्तहानी प्रचंड आहे. सरकारी आकडेवारीनुसार सुमारे ४,००० कोटीचं नुकसान झालं.

चिपको आंदोलनाची सुरुवात २६ मार्च १९७४ रोजी झाली. चंडीप्रसाद भट यांच्या नेतृत्वाखालील दशौली ग्राम स्वराज्य मंडळाने या आंदोलनाचा पाया घातला. हे आंदोलन अलकनंदा नदीच्या परिसरात उभं राह्यलं. सुंदरलाल बहुगुणा यांनी टिहरी-

(पान ३४ वर)

राजकारण

राजकारण : निवडणुकीचे आणि जनआंदोलनांचे

मेधा पाटकर

पश्चिम बंगालमधील पराभव भाजपच्या चांगलाच जिव्हारी लागला. खरेतर पश्चिम बंगालमध्ये भाजपची ताकद कधीच नव्हती आणि संख्येच्या दृष्टीने पहायचे झाले तर मागील निवडणुकीतील ३ जागांवरून थेट ७६ पर्यंत झेप घेणे ही मोठीच मिळकत होती. परंतु भाजपने पश्चिम बंगालची निवडणूक प्रतिष्ठेची बनवली. मोठमोठे दावे केले. बंगालला रणभूमीचे स्वरूप आणले. देशात कोविडचा कहर चालू असताना खुद्द पंतप्रधान, गृहमंत्री, भाजपचे अध्यक्ष कैलास विजयवर्गीय बंगालमध्ये तळ ठोकून बसले होते. आत्यंतिक विखारी, उचकवणारी आणि तुच्छतायुक्त भाषा त्यांनी वापरली. निवडणुकीनंतर (तृणमूलवाल्यांना) 'कुत्तों की तरह गोली मारण्या'ची भाषा खुद्द भाजपाध्यक्षांनी करावी यावरून त्यांच्या प्रचाराची पातळी कळू शकते. धार्मिक ध्रुवीकरणाशिवाय त्यांच्याकडे कुठलेही मुद्दे नव्हते. ना त्यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाचा कोणी उमेदवार होता. परंतु कोण मुख्यमंत्री नको, या मुद्यावर ममता बॅनर्जींना लक्ष्य करत भाजपने ही निवडणूक लढवली. तृणमूल काँग्रेसला मिळालेले घसघशीत बहुमत भाजपच्या चांगलेच जिव्हारी लागले आणि तो पराभव त्यांना पचवता आला नाही. खरेतर निवडणूक आयोग पूर्णपणे भाजपच्या दावणीला बांधलेला असताना, न्यायपालिकाही आपले तटस्थ राहण्याचे कर्तव्य विसरल्यागत वागत असताना त्या दोन्ही महत्त्वाच्या आयुधांचा पुरेपूर उपयोग करत भाजपने ममता बॅनर्जींना जखडून ठेवण्याचा पूर्ण प्रयत्न केला. परंतु ममता बॅनर्जी त्यांच्या डावपेचांना पुरून उरल्या. अखेर स्वत:च्या मतदारसंघाची आहुती देऊनही त्यांनी राज्यात बहुमत खेचून आणलेच.

पश्चिम बंगालमधील निवडणुकांनंतर तिथे उसळलेली हिंसा हे ममता बॅनर्जी यांच्यापुढचे पहिले आव्हान राहिले. इतके, की त्यांची निर्विवाद जीतही राष्ट्रपती राजवटीत बदलली जाते की काय असे वातावरण काही काळ तयार झाले. तशी पश्चिम बंगालला हिंसा नवी नाही. परंतु यावेळी ज्या तऱ्हेने निवडणुकीचे मैदान ही रणभूमी बनवली गेली, त्याचेच पुढचे पाऊल ही हिंसा होती. यामध्ये केवळ भाजपचेच नव्हे तर तृणमूल काँग्रेस व अन्य पक्षांचे कार्यकर्तेही बळी पडले. निवडणुकीदरम्यान पोलीस प्रशासन निवडणूक आयोगाच्या ताब्यात असते हे इथे लक्षात घ्यायला हवे. ममता या कुशल खेळाडू असल्यामुळे त्यांनी सूत्रे हाती घेताच निवडणूक आयोगाने नेमलेल्या वीस अधिकाऱ्यांना बदलले आणि हिंसेवर काबू मिळवला. तथापि, कोणाचीही व कुठल्याही प्रकारची हिंसा ही त्याज्य आणि निषेधार्हच आहे. त्यामुळे बंगालमध्ये निवडणुकीदरम्यान आणि निवडणुकोत्तर झालेली हिंसा कुणाचीही असली तरी समर्थनीय नाही. तिच्या तत्काळ आणि तटस्थ चौकशीची मागणी जनआंदोलनांनी केलेली आहे.

निवडणुकीतील हिंसेबरोबरच, बंगालमध्ये भाजपने केलेला हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरणाचा प्रयोग निषेधार्ह आणि घातक आहे. धर्माच्या आधारावर मतपेढ्या तयार करणे हे देशाच्या वर्तमान आणि भविष्यकालीन वाटचालीसाठी फारच हानीकारक आहे. परंतु भाजपला त्याच्याशी देणेघेणे नसतेच. या देशात दुहीचे बीज त्यांनीच पेरलेले आहे. बंगाल निवडणुकीतही मुस्लिमबहुल मतदारसंघात तृणमूल काँग्रेसला तर हिंदूबहुल मतदारसंघात भाजपला आघाडी मिळणे हे याच राजकारणाचे फलित आहे.

अशा वेळी, पूर्वीचे मतभेद आणि मनभेदही विसरून तेथील धर्मनिरपेक्ष पक्षांनी एकत्र येण्याची गरज आहे. त्यांनी एकत्रितपणे हिंसेला नाकारावे. भेदाभेदांना नाकारावे. निवडणुका या निवडणुकांसारख्याच लढवाव्यात, युद्धासारख्या नव्हेत, हे ठसवावे. हिंदू वा मुस्लिमऐवजी धर्मनिरपेक्ष वोट बँक बनवावी. भाजपला धर्माचे कार्ड वापरून या निवडणुकीत कुठेही सत्ता मिळालेली नाही; मग ते बंगाल असो, केरळ, तमिळनाडू वा उत्तरप्रदेशातील पंचायत निवडणूक. आपले मुद्दे रोजीरोटीचे, कोविड महामारीशी दोन हात करण्याचे, त्यासाठी हॉस्पिटल्स, ऑक्सीजनच्या उपलब्धतेचे आहेत हे मतदारांनीच दाखवून दिले. भाजपचा हिंदू-

मुस्लिम अजेंडा मतदारांनीच हाणून पाडला.

मात्र डावे पक्ष आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातले शत्रुत्व इतके विकोपाला गेले आहे की यावेळी डाव्या पक्षांपैकी काही प्रत्यक्षपणे भाजपसोबत गेले किंवा त्यांच्या प्रभावक्षेत्रात ममताविरोधी म्हणून भाजपला मतदान झाले. वस्तुत: भाजपचे आव्हान लक्षात घेऊन आतातरी हे मनभेद दूर सारले पाहिजेत आणि धर्मनिरपेक्षतेचा कॉमन मुद्दा बनवला पाहिजे. हे केवळ बंगालमध्येच नव्हे तर देशातील सर्वच राज्यांमध्ये जिथेजिथे भाजपला स्थानिक पक्षांकडून कडवे आव्हान दिले जात आहे अशा सर्वच बिगरभाजप सरकारांच्या राज्यांतील भाजपेतर पक्षांनी धर्मनिरपेक्षतेच्या मुद्यावर एकत्र येऊन भाजपला शह द्यावा. काँग्रेसला तर ही दीर्घ परंपरा आहे. त्यांनी त्यांच्या प्रभावक्षेत्रात व अन्यत्र जिथेजिथे स्थानिक पक्षांशी ते आघाडी करतात तिथे तिथे यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. तरच देश वाचेल – भाजपपासून, भाजपने पेरलेल्या दुहीच्या विषापासून.

असममध्ये तेथील कृषक मुक्ती संग्राम समितीचे नेते आणि सरकारच्या दमनकारी नीतीमुळे दीर्घकाळ तुरुंगात असलेले लढाऊ कार्यकर्ते अखिल गोगोई यांचा विजय अनेकार्थांनी महत्त्वाचा आहे. अखिल गोगोई हे आसाममधील एनआरसी विरोधी आंदोलनाचे प्रतीक बनले होते. त्यांना यूएपीएसारख्या गंभीर आरोपाखाली तुरुंगात डांबलेले असले तरी जनतेने त्यांच्या बाजूने कौल दिला, हे सूचक आहे. त्यांच्या राजौर दल या पक्षाशी काँग्रेसने समझौता केला असता तर अन्य काही ठिकाणी त्यांचे साथी निवडून येऊ शकले असते. जवळजवळ १० मतदारसंघांमध्ये त्यांचे साथी दुसऱ्या क्रमांकावर होते. अर्थात, जनआंदोलनांचे राजकारण करणाऱ्या अखिल गोगोई यांच्यासारख्या आंदोलकाचा संसदीय राजकारणात प्रवेश ही बाब महत्त्वाचीच आहे. अखिल गोगोई यांना आम्ही आमचे सक्रिय समर्थन दिलेले होते. डॉ. संदीप पांडेय, डॉ. सुनीलम्, मी स्वत: अखिल गोगोई यांच्या प्रचारात प्रत्यक्ष सहभागी झालो होतो.

त्याचप्रमाणे शेतकरी आंदोलनाच्या संयुक्त किसान मोर्चाने – ज्यामध्ये जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय सहभागी आहे - विशेषत: बंगालच्या निवडणुकीत प्रभावी हस्तक्षेप केला. शेतकरी विरोधी कायदे करणाऱ्यांना निवडून देऊ नका, अशी भूमिका घेऊन शेतकरी आंदोलनाचे सर्व प्रमुख नेते बंगालच्या निवडणूकप्रचारात उतरले होते.

बंगालमध्ये तळ ठोकून बसलेले भाजपचे सेनापती दिल्लीच्या वेशीवरच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचू शकत नाहीत हे निषेधार्ह आहे. म्हणूनच आता आंदोलनाच्या रणमैदानातूनच या सरकारला आव्हान द्यावे लागेल व ते देऊ हा शेतकरी आंदोलनात सहभागी असलेल्या सर्वच संघटनांचा निर्धार आहे. शेतकरी आंदोलन केवळ दिल्लीपुरते मर्यादित नाही तर उत्तरप्रदेशच्या पंचायत निवडणुकीपर्यंत पोहोचले आहे याची दखल भाजपसह सर्वच राजकीय पक्षांनी घ्यायला हवी व केंद्र सरकारने आतातरी शेतकरी आंदोलनाला मान्य होईल असा तोडगा काढण्यात पुढाकार घ्यावा. अन्यथा देशभरातील शेतकरी-कामगार २०२४ मध्ये या भाजप सरकारला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत. आम्ही आजवर मानत आलो ते हेच जनआंदोलनांचे राजकारण आहे. यापूर्वी काँग्रेस सरकारच्या काळातही अनेक जनहिताचे कायदे जनआंदोलनांच्या रेट्यामुळे झाले हा इतिहास आहे. जन आंदोलनांच्या या राजकारणाला राजकीय पक्षांनीही साथ दिली पाहिजे, जशी आज शेतकरी आंदोलनाला मिळत आहे.

जनतेने भारतीय जनता पक्षाच्या सांप्रदायिक आणि शेतकरी-कामगारविरोधी धोरणांना नाकारले आहे हे जाणून आता बंगाल, केरळ, तमिळनाडू येथे निवडून आलेल्या सरकारांनी आपल्या राज्याचे शेतकरी हिताचे कायदे बनवावेत. शेतकरी कायदे, कामगारविषयक संहिता, वीजबिल या संदर्भात जनहिताचे निर्णय घ्यावेत. त्याचप्रमाणे सर्व धर्मनिरपेक्ष पक्षांनी आपला एक किमान समान कार्यक्रम आखून एकत्र यायला हवे. हिंसेला नकार, नैसर्गिक संसाधनांच्या लुटीला नकार देणारी अशी ही एकजूट असावी. सार्वजनिक उद्योग, बँका वाचवणे, बेरोजगारीच्या प्रश्नावर गांभीर्याने दूरगामी तोडगा काढणे, कोविड व तत्सम महामारीच्या संकटांचा योग्य रीतीने सामना करणे हे आता त्यांना जनतेने दिलेले कर्तव्य आहे हे समजून घेऊन त्यांनी या सर्व मुद्यांवर एकत्रितपणे भूमिका घ्यावी.

(शब्दांकन : सुनीती सु. र.)

medha.narmada@gmail.com

सत्याग्रह : सत्य, अहिंसा, प्रेम यांचा मिलाफ

सत्याग्रही संघर्षांचा इतिहास

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात व त्याहीपूर्वी दक्षिण आफ्रिकेत व त्याहीपूर्वी वैयक्तिक जीवनात गांधीजींनी केलेल्या सत्याग्रही संघर्षाचा आढावा घेतल्यास त्यांच्या सत्याग्रहाच्या वाटचालीबद्दल स्पष्टता येऊ शकेल.

स्वातंत्र्यचळवळीत धोरण म्हणून अहिंसेचा अंगिकार करण्यात आला. सत्याग्रहातील सविनय प्रतिकाराच्या पैलूवर भर दिला गेला. परंतु ध्येय म्हणून अहिंसा स्वीकारायची देशाची तयारी झाली नव्हती. धोरण किंवा तात्पुरते ध्येय म्हणूनच देशाने सत्याग्रहाचा अंगिकार केला. त्याबद्दल गांधीजी लिहितात – ''आपण हिंदी लोकांनी अहिंसेला जरूर तेवढा वाव कधीच दिलेला नाही. आश्चर्याची गोष्ट अशी की आपल्या अपुऱ्या अहिंसेनेच आपण यशाचा केवढा टप्पा गाठला आहे...'' (हरिजन, २०.४.४०.)

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या गांधीजींच्या नेतृत्वाखालील सुमारे तीस वर्षांच्या काळात ६ अखिल भारतीय स्वरुपाच्या चळवळी झाल्या. अन्य स्थानिक प्रश्नांसाठीची छोटीमोठी आंदोलने होत होतीच. हा सर्व मिळून काळ सुमारे १० वर्षांचा आहे. मधल्या सर्व काळात गांधीजींनी सत्याग्रहासाठी, अहिंसक लढ्यासाठी देशाला तयार केलेले दिसते. ते केवळ ब्रिटिश साम्राज्यशाही विरोधातील नव्हे तर येथील विषम समाज व्यवस्थेविरोधातील लढाईसाठीही तयार करणे होते. म्हणूनच अस्पृश्यतानिवारण, सर्व समाजाचे स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होणे, स्त्रियांनी मोकळेपणाने चळवळीत सामील होणे इथपासून तर चरखा व खादीद्वारे आर्थिक स्वावलंबनाकडे जाणे व दारूमुक्तीसारख्या आंदोलनांतून समाजाला व्यसनमुक्त करण्यापर्यंत कितीतरी उदाहरणे देता येतील. लाखो स्त्रीपुरुषांनी आणि मुलांनी स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतला आणि आणीबाणीच्या प्रसंगी देखील अहिंसेची शिस्त पाळली. हजारोंनी अपार क्लेश सहन केले. पोलीस व लष्कर यांचे पाशवी अत्याचार झेलले. शांततामय कायदेभंगासाठी लोकांना तुरुंगात घालण्याऐवजी लाठ्या-बंदुका वापरल्या गेल्या. झेंडा मिरवणाऱ्या किंवा बेकायदा मीठ घेऊन जाणाऱ्या लोकांना पकडायचे सोडून पोलीस आणि सार्जंटांनी मुलांमुलींचे कोवळे नाजूक हात झेंडा किंवा मीठ काढून घेण्यासाठी पिरगळले. शिरीषकुमारची गोष्ट सर्वश्रुत आहे. शांततेने चाललेल्या मिरवणुकी अडवून त्यांच्याभोवती पोलिसांचे कडे केले जाई व अखेर लाठीमार करून मिरवणूक मोडून काढण्यात येई. अशा एकेका लाठी हल्ल्यात शेकडो लोक जखमी झालेले आहेत. आणि तरी देखील त्यांच्या मनात प्रतिहल्ला करण्याची नुसती कल्पना देखील आली नाही. काही तुरळक ठिकाणी जनतेकडून हिंसेचे प्रकार झाले, परंतु ज्या ठिकाणच्या कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव होती तेथे पूर्वनियोजित कार्यक्रम म्हणून हिंसक प्रकार कधीच घडले नाहीत. अत्यंत प्रक्षोभक स्थितीत किंवा सरकारच्या अत्यंत चीड आणणाऱ्या कृत्यांमुळे काही ठिकाणी जमावाकडून हिंसेची कृत्ये झाली. परंतु प्रत्येक वेळी पुढाऱ्यांनी त्यांचा निषेधच केला आणि वेळीच परिस्थिती काबूत आणून असल्या प्रकारांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून जास्तीत जास्त दक्षता घेतली. काहीशी गंभीर स्वरुपाची हिंसा घडल्यावर गांधीजींनी १९१९ आणि १९२२ साली सबंध चळवळ थांबवली, मात्र त्याचबरोबर हेही ठासून सांगितले की हिंसेला सत्याग्रह जबाबदार नसून उलट सत्याग्रहामुळे जनतेच्या हिंसेला पायबंद बसण्यास मदत झाली. देशात सत्याग्रहाचे वातावरण नसते तर निश्चितच कितीतरी अधिक हिंसा घडली असती. हिंसा ही निखालसपणे अपायकारक असल्यामुळे, स्वपक्षात घडो की प्रतिपक्षात घडो, ती काबूत ठेवलीच पाहिजे याची जाणीव गांधीजींना होती. शारीरिक सामर्थ्यापेक्षा नैतिक सामर्थ्य, हिंसेपेक्षा समजुतदारपणा, द्वेष आणि क्रोध यांऐवजी प्रेम, रणक्षेत्राऐवजी चर्चा आणि तलवारीऐवजी लेखणी आणि वाणी यांच्या अंगीकाराचे

त्यांचे आवाहन आहे. ''(आम्ही सोसलेल्या क्लेशांमुळे) ज्यावेळी तुमची हृदये पाझरतील त्याचवेळी मानसिकदृष्ट्या तडजोडीला योग्य असा क्षण निर्माण होईल.'' *(१९३१ मधील गोलमेज परिषदेपुढील भाषण)*

शांततामय साधनांपैकी सत्याग्रह हे सर्वात अखेरचे पण तितकेच शक्तिशाली साधन आहे. सनदशीर चळवळींसारखे इतर सर्व उपाय करून झाल्यानंतरच सत्याग्रहाचा मार्ग अवलंबायचा असतो. त्याचे स्थान थेट हिंसक प्रत्यक्ष प्रतिकारा-सारखे असते. सामान्यपणे ज्यावेळी सशस्त्र युद्ध झाले असते त्याच अवस्थेत सत्याग्रह करण्याचा प्रसंग येतो. असमाधान, संतापाची तीव्रता, निराशेचे प्रमाण आणि अखेरचा उपाय योजण्याची अपरिहार्यता या सर्व गोष्टी सत्याग्रहात आणि हिंसामार्गांत सारख्याच असतात. गांधीजींचा असा दावा होता की त्यांनी जनतेच्या पराकोटीच्या क्रोधाचा रोख शत्रूपासून वळवला व स्वत:ला क्लेश सहन करावे लागतील अशा कृत्यांच्या द्वारा तो अभिव्यक्त केला.

गांधीजींनी अहिंसक सत्याग्रहाची तुलना अनेकदा सशस्त्र युद्धाशी केली आहे ते म्हणतात - ''लढाऊ सैन्य सामान्यपणे संघटित युद्धांत ज्या तऱ्हेची शिस्त पाळते त्या तऱ्हेची शिस्त जनतेला योग्य वळण लावून लावली तर अहिंसेच्या लढ्याच्या वेळी पाळली जाणार नाही असे म्हणण्याचे मुळीच कारण नाही.''

सत्याग्रहाचे तंत्र

सत्याग्रहासाठीचे प्रशिक्षण गांधीजी अनिवार्य मानत होते. सैन्य, त्याचे शिक्षण, दारूगोळा व इतर साधनसामुग्रीशिवाय जसे युद्धावर जाता येत नाही, तसेच प्राणार्पणाची तयारी ठेवणारी माणसे बरोबर असल्याशिवाय सत्याग्रहमोहीम सुरू करता येत नाही असे त्यांचे मत होते. तथापि सत्याग्रहाचे एक फार मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यात संख्याबलासाठी अडून राहावे लागत नाही. आपली बाजू न्याय्य असेल आणि प्रतिकारसाधने शुद्ध असतील तर एकटी व्यक्ती देखील सत्याग्रहलढा सुरू करून तो चालू ठेवू शकेल. दुसरे म्हणजे त्याला कुठलीही जड साधनसामुग्री लागत नाही. जी तयारी करायची ती सर्व नैतिक आणि मानसिकच असते.

आपण सत्याग्रहाची शक्ती जसजशी वाढवत जाऊ तसतशी त्यासाठी कराव्या लागणाऱ्या खास तयारीची गरज कमीकमी होत जाईल. सत्याग्रहात साध्य व साधन हे एकरूपच आहे. सत्याग्रही जी साधने वापरतो तेच त्याचे साध्यही असते. गांधीजी म्हणतात, सत्याग्रह ही एकप्रकारची सेंद्रिय वाढच आहे व ती एकजिनसी असते.

विशिष्ट उद्दिष्ट साधण्याच्या हेतूने हाताशी असलेल्या शक्ती शिस्तबद्ध स्वरुपात खड्या करणे म्हणजे संघटन. संघटन आणि शिस्त याला गांधीजी फार महत्त्व देतात. मात्र ती शिस्त अंत:स्फूर्तीतून आलेली असावी असा त्यांचा आग्रह आहे. कुठल्याही कार्याची निर्मिती ही प्रतिभा आणि स्फूर्तीतून होत असली तरी त्याची परिपूर्णता व त्याचा प्रभाव ही सहेतुक प्रयत्न व शिस्त यावरच अवलंबून असतात. सत्याग्रहाच्या बाबतीत गांधीजींचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे त्यांचे संघटन. त्यांनी त्याला व्यवस्थित अशा शास्त्राचे स्वरूप दिले. शिस्तबद्ध आणि अंत:स्फूर्त अशा कार्यकर्त्यांचे दल निर्माण करणे ही सत्याग्रहाच्या संघटनेची आणि पूर्वतयारीची पहिली पायरी असते. प्रतिपक्षाच्या हिंसेपुढे मान तुकवणाऱ्या भेकड वृत्तीच्या माणसांचा सत्याग्रहाला काहीही उपयोग नाही असे गांधीजी म्हणतात. जास्तीतजास्त भीषण हिंसेला देखील अहिंसेने टक्कर देता येईल असे ज्यांना वाटते त्यांचीच गरज सत्याग्रहासाठी असते. म्हणून ज्यांचा सत्य आणि अहिंसेवर तत्व विधायक कार्याद्वारे त्या-त्या समुदायाचे स्वरूप बदलून त्याच्यात आत्मविश्वास, स्वाभिमान आणि हिंमत निर्माण होईल असे ते असले पाहिजे. विधायक कार्याद्वारे होणारी सेवा ही लोकांना स्वावलंबी आणि स्वतंत्र करणारी असली पाहिजे. विधायक कार्य जर संघटितपणे चालू राहिले तर सत्याग्रहासाठी लोकांची संघटना करण्याच्या दिशेने बरेचसे कार्य झालेले असल्याचे आढळून येईल. विधायक कार्यामुळे ज्याप्रमाणे जनतेचे रहाणीमान आणि दर्जा वाढेल त्याचप्रमाणे परस्परसहकार्य, ऐक्यभाव, सत्यप्रीती आणि अन्यायाची घृणा यांची बीजे पेरली जातील.

आत्मशुद्धी हे सत्याग्रहातले मूलतत्व आहे. म्हणूनच अमली पदार्थांपासून मुक्ती, प्रार्थना इत्यादी बाबींचा समावेश विधायक कार्यात व दैनंदिन व्यवहारात करण्यात आला होता.

सत्याग्रहात बहुतेकदा नेत्याचा बळी सर्वप्रथम जातो. ते फासावर गेले नाहीत तरी तुरुंगात जातात. त्यांच्या अनुपस्थितीत

मागे राहिलेल्या सैनिकांनी लढा चालवायचा असतो म्हणूनच शिस्त अत्यावश्यक असते. गांधीजींचे स्वत:चे जीवन ही एक कठोर शिस्त आहे. त्यात अगदी प्रार्थना, सूतकताई, मौन यांचाही काटेकोर समावेश आहे. आत्मसंयमन ही एकप्रकारची चेतनाच आहे. ती प्रतिक्षिप्त क्रियेने काम करते. ही शिस्त हिंसक लढाईसाठी लागणाऱ्या शिस्तीहून सर्वस्वी भिन्न, किंबहुना विरोधी असते. जसे – तिथे मारण्याची प्रेरणा, द्वेश, राग, भीती वा दहशत निर्माण करणे याची गरज असते याउलट इथे प्रसंगी मरण्याचीही तयारी, द्वेषाऐवजी प्रेम, शांती, निर्भयता, सहनशीलता यांची गरज असते. म्हणून सत्याग्रही वृत्तीचे शिक्षण महत्त्वाचे आहे – जे गांधीजी जाणीवपूर्वक करत होते. ध्येयाने प्रेरित झालेले लोक अशक्य वाटणारे धैर्य लोक दाखवू शकतात याचा प्रत्यय धरासना, गुरूका बाग अशा अनेक सत्याग्रहांत आला.

सत्याग्रही बनण्यासाठी किमान तयारी म्हणून गांधीजींनी चार सूत्रे सांगितली –

- आध्यात्मिक दृष्ट्या – समदृष्टी, सर्वांवर प्रेम, विरोधकांबद्दलही सद्भाव, शुचिता, सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी, सत्याचे स्पष्ट दर्शन

- नैतिक दृष्ट्या – निर्भय, धैर्यवान, विनयी, परोपकारी, सत्यशील, योग्यायोग्य व गुणावगुण पारखण्यात दक्ष, मोकळ्या मनाचा, आशावादी, आनंदी, कोणत्याही स्वरुपातील हिंसा टाळणारा.

- बौद्धिक दृष्ट्या – कार्याचे स्पष्ट आकलन, स्वत:ची बाजू सत्याधिष्ठित असल्याची खात्री, आचरित असलेल्या मार्गाची संपूर्ण जाणीव, आपले वर्तन व निष्ठा यांबद्दल खात्री

- शारीरिक दृष्ट्या – आरोग्यसंपन्न व काटक, शारीरिक श्रमांची सवय व यातना आणि कष्ट सहन करण्याची तयारी, साधेपणाने राहण्याची तयारी, चलाख, कार्यप्रवण, खेड्यापाड्यातून पायी फिरता येणे.

तशीच त्यांनी सत्याग्रह्यांसाठी पथ्य-कुपथ्येही सांगितली–

- कोणत्याही परिस्थितीत सत्याग्रहात असत्य, जीवित किंवा मालमत्ता यांच्याविरुद्ध होणारी हिंसा, गुप्तता, अन्याय, दु:ख, फसवणूक, अप्रामाणिकपणा, कपट किंवा पिळवणूक यांना वाव नाही.

- सत्याग्रहीने सामाजिक, आर्थिक, राजकीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय यांपैकी कोणतेही कार्यक्षेत्र वर्ज्य मानता कामा नये.

- सत्याग्रहीने अन्यायाच्या खरेपणाविषयी प्रथम स्वत:ची पूर्ण खात्री करून घेतली पाहिजे.

- या खातरजमेनंतर ज्या लोकांना त्या अन्यायाची झळ लागत असेल त्यांना त्यातून बाहेर पडण्याची तळमळ लागून राहिली आहे किंवा नाही हे पाहणे.

- त्या अन्यायासाठी जबाबदार असणाऱ्यांना शक्य तेवढ्या सभ्य भाषेत गाऱ्हाण्याचे सत्य स्वरूप कोणत्याही प्रकारची अतिशयोक्ती न करता सांगून त्याच्या जबाबदारीची जाणीव करून द्यावी.

- वर्तमानपत्रे, सभा या माध्यमांतून विवेक जागृत होऊ शकेल अशा स्वरुपाचा प्रचार चालू ठेवावा, मात्र ते करतानाही सत्य, संयम, विचार-उच्चार आणि आचार यांत नम्रता पाळण्याची काळजी घ्यावी.

- जे अन्याय सहन करत आहेत त्यांच्यात जास्तीत जास्त जागृती केली पाहिजे व ते हालअपेष्टांना तोंड देण्यास व सत्याग्रहाचा अवलंब करण्यास तयार आहेत किंवा नाहीत हे अजमावले पाहिजे.

- बहुसंख्य लोक सत्याग्रहाला तयार नसतील तरी व्यक्तिश: सत्याग्रह करून अन्याय सहन करणाऱ्यांच्यात जागृती निर्माण करता येईल.

- अन्यायाला जबाबदार असलेल्या व्यक्तीला परिस्थितीची सूचना देऊन तो अन्याय दूर करण्याचे आवाहन करावे. त्याचा उपयोग झाला नाही तर लढ्याचा निर्णय घेऊन त्यासाठी योग्य असे सत्याग्रहाचे स्वरूप निश्चित करावे. ते स्वरूप त्या परिस्थितीतूनच निर्माण झालेले, सर्वांना पटण्यासारखे आणि ज्यात जास्तीत जास्त लोक सहभागी होऊ शकतील असे असावे. सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी इतर सर्व साधनांचा उपयोग करून पाहण्यात आलेला असावा. अन्याय करणाऱ्याला पुरेशी पूर्वसूचना देऊन पुरेशा संघटनेनिशी आणि तयारीनिशी सत्याग्रह सुरू करावा.

- आपल्या मनोनिग्रहाचा आणि चिवटपणाचा विरोधकांवर तीव्र परिणाम होतो आणि नैतिकदृष्ट्या चूक त्यांची आहे असे

लक्षात आल्यावर विरोधक आपली ताठर भूमिका सोडून चर्चेला व तडजोडीला तयार होतो. हीच सत्याग्रह मोहिमेची परिपूर्णता आहे.

- सत्याग्रहासाठी कमीतकमी पैसा वापरावा, जो लागेल तो शक्यतो तिथल्यातिथे उभा करावा व त्याचा विनियोग अत्यंत काटकसरीने करावा. जमा केलेल्या प्रत्येक पैशाचा तसेच खर्चाचा काटेकोर हिशोब ठेवावा. सत्याग्रहाची मुख्य शक्ती लोकांचे नीतिधर्य ही आहे. पैसा ही नव्हे.

- सरकारी अधिकारी, पोलीस अटक करण्यास आले असता लोकांनी आपणहोऊन त्यांच्या स्वाधीन व्हावे. तुरुंगात असताना तेथील कायदे (स्वाभिमानाला धक्का न लावणारे) पाळावेत.

- सत्याग्रहादरम्यान कुठलाही शिस्तभंग, अनैतिक वर्तन झाल्यास संघटकांनी उपवास अथवा तत्सम मार्गांचा अवलंब करावा.

अर्थात, सत्याग्रहाचा असा काही एकच एक कार्यक्रम असत नाही, हे देखील त्याचे अभिनवत्वच आहे. हे अभिनवत्व समजून घ्यायचे तर गांधीजींच्या सत्याग्रह कल्पनेचा विकास समजून घ्यायला हवा.

सुनीती सु. र.
napm.suniti@gmail.com

(विशेष : पान ८ वरून)

जागा का असू नयेत ? इंग्लंडमधील शेफिल्ड विद्यापीठातील परिसंस्था विभागामधील प्रा. कार्ल इव्हान्स म्हणतात, की शहरामधील मोठ-मोठ्या हरित जागांमध्ये फक्त हिरवाई असून चालणार नाही. तेथे वनस्पतींसोबत वाढणारी जैवविविधता हवी आणि यासाठी तेथे विविध लहान व मोठे वृक्ष, वेली, इतर झुडपे हवीत.

आज इंग्लंडमधील पन्नास टक्के बागांमध्ये फक्त गवताची आकर्षक कटाई व रचना केलेली आढळते. इव्हान्स म्हणतात, 'याला मी शहरामधील हरित ठिपके असे कधीही म्हणणार नाही.' जेथे जैवविविधताच नाही, ती हरित जागा कशी असू शकेल ? प्रिन्स्टन विद्यापीठ, इंग्लंडमधील प्रा. अनू रंगास्वामी म्हणतात, 'प्रत्येक शहर निर्मितीमध्ये निवारा, पाणी, अन्न, ऊर्जा, दळणवळण आणि स्वच्छता या सहा मापदंडांबरोबरच, समृद्ध हरित जागा असणे हे अतिशय गरजेचे आहे.' शहरांमधील लोकांची कार्यक्षमता वाढण्यासाठी अशा हरित क्षेत्रांची जास्त आवश्यकता असते. यासाठी त्या लॉस एंजलिसमधील एक कोटी वृक्षांची यशस्वी लागवड आणि तेथील वाढलेल्या कार्यक्षमतेवर ते सकारात्मक बोलतात. त्या हरित न्यूयॉर्कच्या यशाबद्दलही कौतुकाने सांगतात. अर्थात, हे फक्त श्रीमंत देशांचे नाही. यापुढे शहरांची वाढ ही गरीब देशांमध्येच जास्त होणार आहे. म्हणूनच, 'मिलान अर्बन फूड पॉलिसी' करारानुसार, जगामधील विशेषत: आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि आग्नेय आशियामधील २११ शहरांनी मोकळ्या जागांवरील हरित क्षेत्र वाढवण्याचा निश्चय केला आहे.

चीनने २०१८मध्ये यासाठी स्वतंत्र खाते निर्माण केले. सर्व शहरांमध्ये मोठमोठी उद्याने आणि विविध शहरांना एकमेकांस जोडणारे 'वन्यजीव कॉरिडार' तयार करण्याची योजना केली आहे आणि त्या दिशेने वेगात काम सुरू आहे. चीन आणि इंग्लंडमधील एका अभ्यासामधून असे दर्शविले गेले, की निसर्गाचे खऱ्या अर्थाने संवर्धन आणि संरक्षण करायचे असेल, तर नागरिकांना निसर्गाच्या जवळ घेऊन जा. निसर्ग अनुभवण्याची त्यांना संधी द्या. यामुळे, त्यांच्या मनात तयार होणारे सकारात्मक विचारच निसर्ग खऱ्या अर्थाने वाचवू शकतील. इंग्लंडमधील वीस हजार लोकांचा निसर्ग सान्निध्यासमवेत प्रकृती आणि मानसिक आरोग्याचा अभ्यास केला गेला. तेव्हा असे आढळले, की आठवड्यात किमान दोन तासांचा निसर्ग सहवास त्यांना उत्तम आरोग्य; तसेच सकारात्मक विचार देतो. हा अभ्यास करणारे प्रा. मॅथ्यू म्हणतात, की आठवड्यात किमान २०० ते ३०० मिनिटांचा निसर्ग सहवास जास्त परिणामकारक आहे.

करोनासारखी साथ नेहमीच नकारात्मकता तयार करते. ती शरीराच्या प्रतिकार शक्तीवर सतत घाव घालत असते. हा साथीचा विषाणू यापुढे पूर्णपणे नष्ट होणे केवळ अशक्य आहे. त्याच्यावर मात करावयाची असेल, तर ती सकारात्मक विचारशैलीमधून नैसर्गिक प्रतिकारशक्ती वाढवूनच होऊ शकते. त्यासाठी रोज थोडा वेळ जवळच्या निसर्गासाठी देणे गरजेचे आहे. करोना रुग्णांसाठी हवा असलेला प्राणवायू पैसे मोजून स्वीकारण्यापेक्षा, अशी वेळ येऊ न देण्यासाठी निसर्गामधील मुक्त प्राणवायूची उधळण त्याच्याच सहवासात का अनुभवू नये ?

(महाराष्ट्र टाइम्सच्या सौजन्याने)

९८६९६१२५३१

जगभर

विदेशी नजरेतून भारतीय कोरोना

चन्द्रशेखर पुरन्दरे

कोरोनाच्या संकटापुढे भारत हवालदिल झाला आहे. मुळात येथे व्यवस्था अशी अस्तित्वातच नाही. मग ते क्षेत्र दारिद्र्यनिर्मूलन असो वा शिक्षण असो वा अन्न-तरतूद असो. त्यात आरोग्य व्यवस्था तर नव्हतीच नव्हती. ते सत्य रोजच्या तीन ते चार लाख नव्या बाधितांच्या आणि चार हजार मृत्यूंनी विदारकपणे पुढे येत आहे. हे आकडे अधिकृत. न्यू यॉर्क टाइम्सच्या अंदाजानुसार खरा आकडा तीसपट असू शकतो. दुसऱ्या एका संशोधक संस्थेच्या मते वास्तवातील बाधितांच्या फक्त तीन ते चार टक्के बाधित भारत नोंदवत आहे. हा अंदाज न्यू यॉर्क टाइम्सच्या जवळ जातो. नागरिकांच्या जीवाची पर्वा नसणारे सरकार ही प्रतिमा उभी राहत आहे. हे लाजिरवाणे वास्तव उद्‌बोधक ठरावे.

एकेक मुद्दा पाहू.

खोटी आकडेवारी

अशा सामूहिक आजाराची खरी आकडेवारी दाबून ठेवणे ही शासकीय परंपरा आहे. अल-जझीरा हे प्रसारमाध्यम आणि द गार्डियन या विश्वासार्ह ब्रिटिश वृत्तपत्राचे हे निरीक्षण आहे. उदा. २०१५-१६ मध्ये भारतात फक्त साडेपाचशे लोक मलेरियाने मृत्यू पावले ही शासकीय आकडेवारी. वस्तुत: त्या दशकात दर वर्षी दोन लाख लोक मलेरियाने दगावले असावेत असा संशोधन संस्थांचा अंदाज आहे. मलेरियाचे निर्मूलन झाले या घोषणेची घाई व त्याचे दडपण असल्याने स्थानिक पातळीवर-ग्रामीण वस्तीत, खेड्यात मलेरियाचा मृत्यू निराळ्या विकाराने झाला अशी नोंद झाली. जे काही मृत्यू मलेरियाने झाले अशी नोंद झाली, ती माहिती दिल्लीपर्यंत पोचलीच नाही. केंद्र सरकारला हवे ते चित्र उभे करायला हे सोयीचे जाते.

हाच प्रकार कोरोनाबाबत मोठ्या प्रमाणावर चालू आहे. त्यात विद्यमान सरकारला टीका सहन होत नाही. त्यामुळे खरोखर किती दगावले व कशामुळे ही माहिती हॉस्पिटल पत्रकाराला देत नाही. सोशल मीडियावर, प्रसारमाध्यमांवर, हॉस्पिटल्सवर खोटी आकडेवारी देण्याचे दडपणही असते. पत्रकारांनी काय लिहायचे यावर त्यांनी स्वत:च सेन्सॉरशिप करावी हा गर्भित इशारा असतो. तसे न केल्यास सरकार या ना त्या कारणाने त्यांचा 'कायदेशीर' छळ करते. [देशद्रोह, अब्रूनुकसानीचे दावे]. सरकारकडून मिळणारी माहिती विश्वासार्ह नसल्याने ज्यांना शक्य आहे ते सोशल मीडिया किंवा परदेशी मीडियावर खऱ्या माहितीसाठी अवलंबून रहातात.

या कारणांखेरीज आणखी एक कारण म्हणजे किती लोक हॉस्पिटलमध्ये दाखल होतात, किती घरीच वैद्यकीय सेवेअभावी दगावतात, याची नोंद घेण्याची व्यवस्थाच नाही. चीनने ही समस्या पद्धतशीर हाताळली [*आंदोलन* , मार्च २०२०]. प्रत्येक बाधितापर्यंत स्वयंसेवक व पक्षाचे कार्यकर्ते पोचले. तो अलगीकरणात अलगच रहातो ना, त्याचे वेळोवेळी तपमान, इत्यादीवर ते २४/७ नजर ठेवत . ही तृणमूल व्यवस्था भारतात नाही, त्याचे संयोजनही नाही.

बेभरवशाच्या आकडेवारीचे उदाहरण म्हणजे दिल्लीतील मृतांची स्मशानाची आकडेवारी आणि दिल्ली सरकारचा मरण पावलेल्यांचा आकडा यात तफावत असते. सरकारी आकडे कमी असतात. हे तर राजधानीत. तेच इतर शहरात. ग्रामीण भागात विशेषत: दुर्गम भागात किती बळी पडतात हे कधीच कळणार नाही. ही 'व्यवस्था'. याचे आर्थिक कारण म्हणजे आरोग्यसेवेवर भारत एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३ टक्के खर्च करतो. [द इकॉनॉमिस्टच्या अंदाजानुसार त्याहून कमी - १.२ टक्के] ब्राझील ९ टक्के तर अमेरिका १७ टक्के. दोन्हीची लोकसंख्या भारताहून कमी आणि उत्पन्न जास्त.

जगात मदतीवर अवलंबून असणाऱ्या इतर देशांचा कल बाधितांची व बळींची संख्या वाढवण्याकडे असतो. म्हणजे मदत जास्त मिळते. भारताच्या राजकीय नेतृत्वाला आपल्या पक्षाची राष्ट्रीय आणि देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिमा जास्त महत्त्वाची वाटते. म्हणून कमी आकडे जाहीर होतात. त्या वृथा अभिमानाचा

बळी पडतो तो सामान्य माणूस, त्यातही निराधार गरीब.

भर म्हणून भारतात नवीन प्रकारचा कोरोना व्हायरस सापडला आहे. त्याचा प्रसार झाल्यास तो जगाला आगामी धोका आहे. म्हणजे हा प्रश्न फक्त देशांतर्गत गलथान कारभाराचा रहात नाही. याकडे जागतिक माध्यमे लक्ष वेधत आहेत.तो मुद्दा आता पाहू.

शेजारी देशांमध्ये भारतीय कोरोनाव्हायरसचा संसर्ग

यातील नेपाळला या संसर्गाची मोठी झळ बसू लागली आहे. प्रमुख कारण म्हणजे भारत-नेपाळ ११०० मैलांच्या सीमेत अनेक फटी आहेत. मोठ्या प्रमाणावर लोक अनधिकृतरीत्या सीमा पार करू शकतात. नेपाळमधून भारतात प्रचंड संख्येने मजूर येतात. भारतात कोरोनाची दुसरी लाट आल्यावर व लॉकडाऊन सुरु झाल्यावर ते परत नेपाळला गेले आणि कोरोना घेऊन गेले. नेपाळने जर मे महिन्याच्या सुरुवातीलाच सीमा बंद केल्या असत्या आणि लस उपलब्ध असती तर आता अचानक वाढणाऱ्या संसर्गाचे प्रमाण कमी झाले असते. भारतातून नेपाळला परतणाऱ्या कामगारांची संख्या पहाता प्रश्नाचा विस्तार लक्षात येतो. कांचनपूर या भारत-नेपाळ सीमेवरील नेपाळमधील जिल्ह्यात मे-मध्यापर्यंत [लेख लिहिण्याच्या वेळी] रोज १५०० हून जास्त नेपाळी नेपाळला परतले. त्यातील २० टक्केंना कोविद झाला होता. बांके या दुसऱ्या सीमावर्ती जिल्ह्यात याच सुमाराला एका आठवड्यात ९००० कामगार भारतातून परतले. त्यातल्या वीस टक्केंचीच चाचणी झाली कारण चाचणी करण्याची सामग्रीच उपलब्ध नव्हती. त्यातील ३० टक्के कोरोनाग्रस्त होते.

भारतासारखेच तेथील हॉस्पिटल्स जागेअभावी पेशंट्स घेण्याचे नाकारत आहेत, ऑक्सिजनचा तुटवडा आहे. त्यामुळे मृत्यु होत आहेत.

भारतातील सीरम इन्स्टिट्यूटने नेपाळ, बांगलादेश, श्री लंका यांना लस निर्यात करणे थांबवल्यावर त्या देशांमध्ये लशीचा एकदम तुटवडा निर्माण झाला आणि आता ते देश चीन, रशियाकडे वळत आहेत. बांगलादेशात आता दुसऱ्या लशीचे १५ लाख डोस कमी आहेत. पहिल्या लशीत त्याहून जास्त तूट. शेजारच्या देशांच्या मानाने बांगलादेशात परिस्थिती आता बरी आहे पण मे महिन्यात तेथे भारतातून आलेला कोरोनाचा व्हायरस आढळला आहे. त्याचा संसर्ग अधिक झपाट्याने होतो.

भूतानने परदेशी कामगारांना म्हणजे मुख्यत: भारतीय कामगारांना यायला बंदी केली आहे, .

श्री लंकेला एक-चतुर्थांश पर्यटक भारतातून येत असत. बंधने शिथिल झाल्यावर एप्रिलमध्ये भारत-श्रीलंका प्रवास सोपा झाला. लगेच भारतीय पाहुण्यांनी कोरोना आणला. आता या दोन देशांतील प्रवास बंद झाला आहे. त्यामुळे तेथील पर्यटन व्यवसायावर मोठीच आपत्ती आली आहे.

हे चित्र शेजारच्या देशांचे झाले. ब्रिटनमध्ये लॉकडाऊन हळूहळू कमी करण्यात येत आहे. पण भारतीय व्हायरस तेथेही आढळला आहे. त्याचा फैलाव सुरू झाला तर लॉकडाऊन परत वाढवावा लागेल असा इशारा पंतप्रधानाने दिला आहे.

म्हणजे भारतात हाताबाहेर गेलेला कोरोना हे जागतिक संकट आहे. त्याच्या इलाजांवर खर्च अब्जावधी डॉलर्समध्ये जाईल. शिवाय प्रवास, व्यापार यांच्यावर अनिष्ट परिणाम होणार.

आर्थिक दुष्परिणाम

Pew या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संशोधन संस्थेनुसार, जानेवारी २०२० ला ४.३ टक्के भारतीयांचे दररोजचे उत्पन्न २ डॉलर्सहून कमी होते. एक वर्षानंतर हे प्रमाण ९.७ टक्केवर गेले आहे. म्हणजे १३.४ कोटी लोक. बंगलोरच्या अझीम प्रेमजी विद्यापीठानुसार मागच्या वर्षीच्या लॉकडाऊनने २३ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलले गेले. लॉकडाऊन दरम्यान ९० टक्के गरीबांना पोटभर अन्न परवडेना. लॉकडाऊन नंतरच्या सहा महिन्यांनीदेखील त्यांचा आहार आधी इतका झाला नाही. मिळवता माणूस मरण पावणे हा कोविदचा सगळ्यात गंभीर परिणाम.

द इकॉनॉमिस्ट या ब्रिटिश साप्ताहिकानुसार, कोरोना नव्हता तेव्हा वैद्यकीय खर्चामुळे भारतातील दर २० कुटुंबातील एक कुटुंब दारिद्र्यरेषेखाली जाई. कोरोनामुळे लाखो कुटुंबांना मालमत्ता गहाण ठेवायला लागली आहे, आसुरी व्याजाने कर्ज काढायला लागले आहे. शिवाय जास्तीचे कोविद संबंधित खर्च म्हणजे - हॉस्पिटलमध्ये बेड मिळवून देण्यासाठी, ऑक्सिजन, इंजेक्शनच्या सिरींजेस मिळवून देण्यासाठी वैद्यकीय कर्मचारी लाच घेतात. अँब्युलन्स वाजवी दराच्या तिपटीपर्यंत पैसे लावते, बनावट औषधांचा व्यापार, आग विझवण्याच्या सिलिंडर्सवर रंगरंगोटी

(पान २१ वर)

निमित्ताने

‘मृत्यू’वर बोलू काही...

सुरेश सावंत

हा लेख लिहिताना देशात करोनाच्या लाटेने उच्चांक गाठला आहे. तो छापून येईतो ही लाट ओसरायला लागो, ही मनापासून इच्छा. आजच्या इतके परिचितांचे, जवळच्यांचे ‘मृत्यू’ आयुष्यात कधी मी पाहिले नव्हते. आपणही कोणी पाहिले नसतील. करोनाच्या मागच्या लाटेतही माणसे जात होती. पण थेट नात्यागोत्यात, आप्तस्वकीयांत एकामागून एक माणसे जाणे हे या दुसऱ्या लाटेत घडते आहे. आपल्यापेक्षा वयाने मोठे, दुसरे काही गंभीर आजार सोबतीला असलेल्यांचे मृत्यू दु:ख देत होते, अस्वस्थ करत होते. पण काही काळाने मन त्याचा स्वीकार करत होते. यावेळच्या मृत्यूंनी मात्र हबकून जायला झालेय. अन्य काहीही आजार नसलेले, वेळेवर उपचार सुरू केलेले, आपल्यापेक्षा वयाने लहान, उत्तम तब्येत असलेले, लशीचा एखादा डोस घेतलेले स्नेहमित्र, सहकारी हा करोना गिळतो आहे. कोणी हॉस्पिटलमधून आता मला बरे वाटते आहे, ऑक्सिजनची पातळी वाढते आहे, तुम्ही सगळ्यांनी काळजी घ्या असे कळवतो आणि पुढच्या दोन दिवसांत नाहीसा होतो. सहज चौकशीसाठी आप्तमित्रांना फोन करावा, तर त्यांच्या नात्यात, कधी घरात कोणीतरी करोनाने गेले असल्याचे कळते.

फेसबुक उघडायचे तर आता कोणाचा फोटो समोर येईल याने धडधड व्हायला लागते. आपलाही असाच फोटो लोक टाकतील, त्याखाली आपल्याविषयी काही चांगलं लिहितील ही कल्पना मनाला चाटून नव्हे, तर मधून मधून उसळी मारत राहते. त्याने अधिकच अस्वस्थ व्हायला होते. आपण आता आहोत, हे लिहीत आहोत आणि अचानक संपूनही जाऊ शकतो. हा लॅपटॉप, ही खुर्ची, हे टेबल, ही खोली, खिडकी, घरचे लोक यांना आपण पुन्हा कधीच पाहू वा भेटू शकणार नाही, ही कल्पना भुंग्यासारखी रोंरावत राहते. आपण मरु. विझून जाऊ. आपल्याला काहीच जाणीवा नंतर असणार नाहीत.म्हणजे यातना, विरहाचे दु:ख, चिंता काहीच असणार नाही, हा विवेकी साक्षात्कार स्वत:विषयी दिलासा देतो. पण आपण नसल्याचा आपल्या जवळच्यांना जो त्रास होईल त्याच्या कल्पनेने टोचणी लागत राहते. तरी बरे, माझ्यावर आता कोणी अवलंबून नाही. (उलट मीच त्यांच्यावर अवलंबून आहे.) ज्यावेळी आई-वडिल, लहान भाऊ माझ्यावर अवलंबून होते, त्यावेळी मला मृत्यूच्या जाणीवेने खूपच अस्वस्थ व्हायला व्हायचे. मी आजाराने, अपघाताने अचानक गेलो तर माझ्यानंतर यांचे काय होणार याने मन पोखरत राहायचे. वास्तविक त्यावेळी काही करोनाची आजच्यासारखी साथ नव्हती. तरीही हा विचार सारखा मनात यायचा. ते आठवले की आता आपल्यावर ते काहीही ओझे नाही, याने खूप हलके वाटते. जीवन आनंदाने जगण्याची, समाजाला उपयुक्त होण्याची क्षमता आपल्यात असताना असे अवेळी आपण जाऊ नये असेच मला वाटते. पण ही क्षमता असलेली आपल्या भोवतालची माणसे पटापट उडून जाताना पाहिली की आपल्या वाट्याला हे येणारच नाही, याची खात्री राहत नाही. पण वर म्हटले तसे आज आपल्या जाण्याने आर्थिक अडचण कोणाची होणार नाही, या विचाराने मृत्यूच्या तावडीत आपण सापडूच नये याची तडफड बरीच कमी होते. म्हणजे, मृत्यूच्या बाबतीत मी आता भाग्यवान असेन. ज्यावेळी माझ्यावर कुटुंब पोसायची जबाबदारी होती, त्यावेळी अशी काही करोनाची साथ आली नाही, हे किती चांगले झाले!

ही भावना म्हणजे आत्मकेंद्रितताच खरे तर. ज्यांच्यावर कुटुंबाच्या पालनाची जबाबदारी आहे, त्यांचे मृत्यू होत असताना रोज पाहतो आहे. आम्ही मित्रमंडळी काही सहाय्य जमा करतो, इतरांकडून मिळवतो व मृत्यू झालेल्या सहकाऱ्याच्या कुटुंबांना देतो. पण ते प्रतीकात्मकच आहे. त्यांच्या घरातील प्रिय माणूस तर गेलेच. पण त्या दु:खाबरोबरच त्याच्या जाण्याने त्या कुटुंबाची प्रदीर्घ काळजी आर्थिक ससेहोलपट होणार आहे, त्यावर आज आमच्याकडे काहीच इलाज नाही. स्वत:च्या मृत्यूच्या विवेकी

मापनातून जी मनाची स्थिरता मिळते, ती या असहायतेने पार बिघडून जाते. मला आनंदाने जगायचे असेल किंवा शांतपणे मरायचे असेल, तर माझ्याभोवतीची ही ससेहोलपट होणार नाही याची शाश्वती मला गरजेची आहे.

मृत्यूविषयी अनेक तत्त्ववेत्त्यांनी लिहिले आहे. मृत्यूची अपरिहार्यता, त्यास स्वीकारण्याची मानसिक तयारी त्यातून होते. खरे म्हणजे मृत्यू हा काही कधीतरी होणारा, काहींच्याच वाट्याला येणारा अपघात वा विजेचे कोसळणे नव्हे. ज्याला जन्म आहे, त्याला मृत्यू आहे. जगातल्या प्रत्येक माणसाला, आज करोनातून सहिसलामत वाचणाऱ्यांनाही मृत्यू गाठणारच आहे. पण म्हणून काही जन्म आणि मृत्यू यांना एकाच भावनेने स्वीकारले जात नाही. जन्म ही आनंददायी तर मृत्यू ही अपरिहार्य व निश्चित दु:ख देणारी बाब आहे. शंभरी गाठलेल्यांचा मृत्यू होतो तेव्हाही अश्रू गाळले जातात. ते जर आजारांनी, वेदनांनी ग्रस्त असतील तर त्या वेदनेतून ते सुटल्याचे समाधानही असते. मात्र त्याचबरोबर कुटुंबासाठी त्याच्या झिजण्याच्या तसेच अन्य भल्याबुऱ्या प्रदीर्घ काळच्या आठवणींचा संचय ज्याच्या अस्तित्वात होता ते अस्तित्व नाहीसे झाल्याची रिक्त भावना काही काळ जवळच्यांच्या मनात राहतेच. असे अचानक नको होते जायला, यांच्या जाण्याने आमचे काय होणार, समाजाची खूप हानी झाली अशा काही भावना या मृत्यूंमुळे असणार नाहीत. तशा त्या कोणी व्यक्त केल्या तर ते एकतर ढोंग किंवा औपचारिकता असेल.

मृत्यूला नकार नाही. ती वस्तुस्थिती कबूल आहे. आपले जीवन पूर्ण जगून झाल्यावर मृत्यू पावणे हे सगळ्यांच्या वाट्याला यायला हवे. आरोग्याच्या, आहार-विहाराच्या, नात्यागोत्यातील प्रेमाच्या बाबी अनुकूल असूनही काही मृत्यू होतील. पण ते अपवाद असावेत. नैसर्गिक असावेत. मनुष्यनिर्मित सामाजिक-आर्थिक पर्यावरण हे त्यास कारण असू नये. आदिम मनुष्य कमी जगत होता. भोवतालच्या स्थितीत तगून राहण्याची क्षमता हाच त्यावेळी निकष होता. आधुनिक औषधांचा शोध लागेपर्यंत आर्थिक सुबत्तेत लोळणारे राजे-महाराजेही मुश्किलीने वयाची साठी पार करत होते. आता सर्वांचेच आयुर्मान वाढले आहे. मात्र मनुष्य निर्मित दारिद्र्य, क्रयशक्तीअभावी पौष्टिक अन्नाची कमतरता किंवा उपासमार, वास्तव्याची जागा गलिच्छ, कर्ता माणूस मेला तर त्याच्या कुटुंबीयांना सामाजिक सुरक्षेची हमी नसणे, सामाजिक-लैंगिक विषमतेमुळे, जाति-धर्माच्या खोट्या उतरंडीमुळे होणारा अन्याय, हिंसा वा उपेक्षा, युद्धे यांमुळे माणसे अकाली मरतात. त्याचा स्वीकार करता येत नाही. त्याला निसर्ग वा ती मरणारी माणसे स्वत: जबाबदार नाहीत. तर इथली सामाजिक-आर्थिक व्यवस्था जबाबदार आहे.

करोनाने होणारे आताचे मृत्यूही असेच तपासावे लागतील. करोना ही जागतिक आपत्ती. ती कशी निर्माण झाली, कोणी जाणीवपूर्वक प्रयोगशाळेत विषाणू तयार केला की नैसर्गिकपणेच कमी हानिकारक विषाणूचे उत्परिवर्तन होऊन तो घातक झाला, याचा शोध घेत राहावा. पण जगातल्या प्रगत-अप्रगत राष्ट्रांतल्या श्रीमंत-गरीब, सर्व धर्मिय-जातीय लोकांना त्याने आपपरभाव न करता गाठले ही वस्तुस्थिती आहे. करोना सगळ्यांशी समभावाने वागला असे आपण जरुर म्हणू शकू. पण त्याच्या विरोधात ज्या उपाययोजना सरकारांनी करायला हव्या त्या न केल्याने तसेच आपल्या आर्थिक धोरणांच्या परिणामी काहींच्या वाट्याला आधीच दुर्बलता आल्याने ही सरकारे आपल्या सर्व नागरिकांना समान संरक्षण देऊ शकली नाहीत. हे निश्चित नैसर्गिक नाही. याला ही सरकारे व एकूण राज्यकर्ता वर्ग जबाबदार आहे. म्हणजेच या करोनाच्या महासाथीचा हाहा:कार कमी करणे हे आपल्या हातात होते. मृत्यू कमी करणे आपल्या हाती होते. ते आपण केले नाही. मृत्यू माणसाच्या हातात नाही. पण तो लांबवणे आपल्या हाती होते. आहे. करोनाच्या मृत्यूंनी हबकलेल्या माझ्यासारख्या अनेकांनी ही आपत्ती केवळ नैसर्गिक नाही, तिला भयावह इथल्या व्यवस्थेने केले आहे, हे लक्षात घेऊन ती व्यवस्था बदलण्यासाठी प्राणपणाने लढले पाहिजे. पुढच्या नैसर्गिक साथींतले प्राण वाचवण्यासाठी ते अत्यंत गरजेचे आहे.

माझ्या लहानपणी आम्हा मुंबईच्या वस्तीत-चाळींत राहणाऱ्यांना आजारी पडल्यावर हॉस्पिटलमध्ये भरती झाले तर खर्च करावा लागेल हे कधी वाटलेच नव्हते. सायन, केईएम, जे.जे.सारख्या हॉस्पिटलांत जायचे. केसपेपरलाही त्यावेळी फी नव्हती. सगळे उपचार विनाखर्च करुन परत यायचे हे गृहीत होते. हॉस्पिटलला जायचा होईल तेवढाच खर्च. किरकोळ आजारांसाठी वस्तीतल्या खाजगी दवाखान्यात जात असू त्यावेळी

थोडा खर्च येई. पण पुढे वस्त्यांतही महानगरपालिकेची आरोग्य केंद्रे सुरू झाल्याने तो मोफतचा पर्यायही असे. मला कुत्रा चावला होता. मी तिसरीत होतो. म्हणजे लहान होतो. पण मी एकटाच महानगरपालिकेच्या आमच्या चेंबूरच्या मा हॉस्पिटलमध्ये जाऊन चौदा दिवस चौदा इंजेक्शने घेतली. त्यावेळी हे कुत्र्याचे इंजेक्शन मोठे असायचे व पोटात दिले जायचे. मी इंजेक्शनला घाबरत नव्हतो हा माझा गुण मानला तरी हॉस्पिटलमध्ये लहान मुलांनीही असे सहज जाणे व हॉस्पिटलनेही तसे उपचार करणे हे सभोवताली वातावरणच होते. माझे वडिल गिरणी कामगार. सतत आजारी असत. विम्याच्या गांधी हॉस्पिटलमध्ये ते सतत भरती होत. माझे मामा महानगरपालिकेत रस्ता दुरुस्ती कामगार. टी. बी. झाल्यावर शिवडीच्या टी. बी. हॉस्पिटलमध्ये भरती झाले. त्यांना भेटायला जाऊ तेव्हा त्यांना मिळालेली शिजवलेली अंडी ते मला देत. बॉम्बे, जसलोक अशी बड्या लोकांची खाजगी हॉस्पिटले तेव्हाही होती. पण आमची त्याबद्दल काही तक्रार नव्हती. आम्हाला उत्तम उपचार सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतून मिळत होते. हे सगळं आदर्श होतं, त्यात काही प्रश्न नव्हते असे नाही. पण आरोग्य ही सरकारची जबाबदारी हे सरकार व समाज मानत होते.

पुढे हे बदलत गेले. खाजगी जनरल प्रॅक्टिस करणारे छोटे दवाखाने ही परवडणारी, उधारीवर चालणारी व्यवस्था त्यावेळी त्रासदायक नव्हती. उलट मदतनसीच होती. मात्र नफा कमावणारी व कट प्रॅक्टिस करणारी चिकित्सालये, रुग्णालये यांचे नंतर पेव फुटले. या गल्लोगल्लीच्या, पोटमाळ्यांवरच्या हॉस्पिटलांबाबतची मानके दुर्लक्षित करुन त्यांना मान्यता देण्यात आल्या. मुंबईतली गर्दी वाढली. देशभरचे गंभीर रुग्ण येण्याचे प्रमाण वाढले. मात्र त्या प्रमाणात महानगरपालिका वा सरकारी हॉस्पिटले वाढली नाहीत. सर्वपक्षीय राज्यकर्ते याला जबाबदार आहेत. या सर्वांनी मिळून खाजगीकरण व कंत्राटीकरणाच्या धोरणाला आरोग्य, शिक्षण यांसारख्या क्षेत्रातही खुले आम चालना दिली.आरोग्य व शिक्षण गरिबांच्या आवाक्याबाहेर जाऊ लागले. संघटित कामगार व नव्या आर्थिक धोरणाने उदयास आलेला नवमध्यमवर्ग या खाजगीकरणाचा पुरस्कर्ता बनला. सार्वजनिक व्यवस्थांचा (आरोग्य, शिक्षण, वाहतूक) वापर कमी कमी करत त्याने जवळपास सोडून दिला. ज्या वस्त्या, चाळींतून हा वर्ग पुढे आला, त्यांच्याशी त्याचे नाते तुटू लागले. ज्यांना याचा आघात बसतो आहे, त्यांनीही आता हे असेच असणार याचा स्वीकार करुन ते मुकाट्याने हे सगळे सोसू लागले.

करोनाने या कमकुवत व्यवस्थांचे कंबरडे मोडले आणि राज्यकर्त्यांच्या बेफिकिरीला उघडेनागडे केले.करोनाच्या पहिल्या लाटेत काय करावे, करू नये याचा राज्यकर्त्यांना अंदाज नव्हता हे समजू शकते. त्याही वेळी आपल्या देशात करोनाचे आगमन झाले त्यानंतर काही महिन्यांनी केंद्र सरकारने त्याची दखल घेतली. पण तरीही आपण या नव्या संकटाला तयार नव्हतो, हे गृहीत धरू. पण नंतर याबाबतची अधिकाधिक माहिती येऊ लागली, वेगवेगळ्या देशांनी केलेल्या उपाययोजना कळू लागल्या, त्यावेळी आपण त्यापासून काय धडा घेतला हा प्रश्नच आहे. इतर देशांपेक्षा आमच्या देशात करोना किती लवकर उताराला लागला, ही जणू आमची कर्तबगारी अशा फुशारक्या आपले पंतप्रधान मारु लागले. मन की बात ऊठसूठ करणारे पंतप्रधान आता या दुसऱ्या लाटेच्या भयावह तांडवावेळी मौन आहेत. लोक मास्क घालत नाहीत, दक्षता घेत नाहीत, यावर जरुर बोलावे. पण निवडणुका, कुंभमेळा या बाबी सरकारच्या हाती होत्या. त्यात त्यांनी जो बेदरकारपणा दाखवला, त्याने करोनाच्या या दुसऱ्या लाटेला तीव्र केले. ऑक्सिजन, आयसीयू बेड, व्हेंटिलेटर यांची चणचण पहिल्या लाटेत अंदाज नसल्याने समजू शकते. पण दुसऱ्या लाटेची शक्यता ठाऊक असताना सरकारने या व्यवस्थांच्या पूर्वनियोजनाकडे दुर्लक्ष कसे केले ? याला काहीच कारण त्यांच्याकडे नाही.

यावेळी मेडिक्लेम वा आर्थिक कुवत मोठी असल्याने खाजगी हॉस्पिटले आम्हाला मिळणारच असा विश्वास असलेल्या मध्यम व उच्च मध्यमवर्गालाही मोठा दणका बसला. मेडिक्लेम आहे, पैसे आहेत तरीही बेड मिळत नाही म्हणून यातल्या असंख्यांना हॉस्पिटलबाहेर गाडीत प्रतीक्षा करत तडफडत प्राण सोडावे लागले. श्रीमंत धार्जिणी आरोग्य व्यवस्था यावेळी या वर्गाच्या उपयोगास आली नाही. केरळच्या आरोग्य मंत्री श्रीमती शैलजा यांनी देशातील आरोग्य व्यवस्थेच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी केली आहे. त्यांच्या या मागणीचे

महत्त्व मध्यमवर्गाला आता तरी कळेल असे धरुया. यावेळी उच्च व सर्वोच्च न्यायालये यांनीही सरकारच्या नाकर्तेपणावर जोरदार आसूड ओढलेत. अलाहाबाद उच्च न्यायालयाने तर आरोग्याच्या व्यवस्था गलथान ठेवून सरकार मानवसंहार करत आहे, इतका गंभीर आरोप सरकारवर केला आहे. जरा जरी लाज नावाची गोष्ट सरकारकडे असेल तर सेंट्रल व्हिस्टासारखे हजारो करोडोंचे प्रकल्प थांबवून त्याने आरोग्य व्यवस्था भक्कम करण्यावर तो खर्च करायला हवा.

सरकारच्या आरोग्यादी सार्वजनिक व्यवस्था दुबळ्या करण्याच्या धोरणाविरोधात बोलणाऱ्या संघटना, कार्यकर्त्यांकडे सरकार, माध्यमे, मध्यमवर्ग व न्यायालयही तसे लक्ष देत नव्हते. आता या सगळ्यांनाच याचे फटके बसले आहेत. सरकारी धोरण मुळातून बदलण्याच्या, एकूण सार्वजनिक व्यवस्था भक्कम करण्याच्या मागणीला मोठ्या जनमताचा पाठिंबा मिळण्याची शक्यता आता तयार झाली आहे. अशावेळी करोनाच्या या आपत्तीत सगळ्या दक्षता घेऊन हा विचार लोकांत विविध माध्यमांतून प्रचारला पाहिजे. जसा करोनाला उतार पडेल, तसे लोकांत जाऊन त्यांना संघटित करुन रस्त्यावर उतरवले पाहिजे. आरोग्य व्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण या प्रमुख मागणीवर परिषदा घेतल्या पाहिजेत. त्यानंतर एकजुटीच्या व्यापक मोर्च्यांनी सरकारला सळो की पळो करुन सोडले पाहिजे. आता नडलेले, संकटात सापडलेले लोक ओळखीपाळखीने मार्ग काढण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचा फोलपणा त्यांना कळतो आहे. पण त्यात जेवढे सहकार्य करता येईल तेवढे अन्य सर्वांनी करायला हवेच. माणसे वाचवण्याला आज प्राधान्य द्यायला हवे. मात्र यापुढे, करोनाच्या कितीही लाटा येवोत, आपल्या जागृत नसण्याने तसेच सरकारच्या अनास्थेने एकही बळी जाणार नाही, या जिद्दीने व त्वेषाने आपण लढले पाहिजे.

करोना आवाज उठवणाऱ्या चळवळीतल्या लोकांचेही बळी घेत आहे. अजूनही बळी जातील. पण हे संकट काही सूर्याचा स्फोट होऊन पृथ्वी नष्ट होणारे नाही. म्हणजेच अख्खी मनुष्यजात काही गारद होणार नाही. तसेच आपल्यातले सगळेच कार्यकर्ते, आपापल्या परीने आवाज उठवणाऱ्या सगळ्याच व्यक्ती काही संपणार नाहीत. जे जोवर आहेत त्यांनी तोपर्यंत आणि जे शिल्लक राहतील त्यांनी त्यापुढे मानवता अधिक न्याय्यपूर्ण, अधिक सुंदर व्हायला लढायचेच आहे. जगाच्या इतिहासात हे होताना आजवर दिसले आहे. तेच आपण करायचे आहे. या संग्रामात भागिदारी करुन आपल्या जगण्याचे सार्थक करुया. मृत्यू लगेच येईल न येईल, पण जे जीवन मिळेल ते याच मार्गाने अर्थपूर्ण होईल. अशा संपूर्ण ऊर्जेने जगताना मृत्यू आलाच तर अखंड वाहणाऱ्या मानवी जीवनप्रवाहातील केवळ एका बिंदूचा तो विराम असेल.

sawant.suresh@gmail.com

(जगभर : पान १७ वरून)

करून ते ऑक्सिजन सिलिंडर म्हणून विकणे, मृतदेह जाळण्यासाठी लागणारे लाकूड दुर्मिळ होणे व चढ्या भावाने उपलब्ध होणे, मृतदेह वाहून न्यायला वाहन न मिळणे, असे अनंत प्रकार.

आंतरराष्ट्रीय बेअब्रू

गंगासमर्पण केलेल्या मृतदेहांचे व त्यांवरील कावळे, कुत्री यांचे फोटो तर आंतरराष्ट्रीय माध्यमांतून प्रसृत झाले आहेतच. [अशा ५० हून अधिक फोटोंची मालिका google वर बघायला मिळते.] याच सुमारास चीनने अत्याधुनिक अंतराळयान सोडले. ते सोडताना प्रचंड आगीचे लोळ उठतात. तो फोटो आणि त्याच्याशेजारी भारतातील सामूहिक चितांचा फोटो एका सोशल मीडियाच्या पोस्टवर चीनमध्ये दाखवला गेला. शीर्षक - रोषणाई - चीनमधील व भारतातील.

जखमेवर मीठ चोळल्यासारखा आरोग्यमंत्री हर्षवर्धन यांचा सल्लाही पश्चिमेत उद्धृत झाला. 'डार्क चॉकलेट खा, त्याने कोरोनासंबंधित ताणतणाव कमी होतात.' जागतिक बँकेनुसार ८६ टक्के भारतीयांना पुरेसा पौष्टिक आहार नसतो, याची आठवण पाश्चात्य माध्यमांनी डॉक्टरसाहेबांना करून दिली आहे. फ्रेंच राज्यक्रांतीत राणीला सांगण्यात आलं की भुकेने लोक उठाव करत आहेत. त्यावर ती म्हणाली - त्यांना भाकरी मिळत नसेल तर केक खाऊ दे.

purandarearts.com
art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk

कार्यकर्ता

टीचर

अनिता पगारे

लढवैय्या आणि संवेदनशील कार्यकर्ता अनिता पगारे यांच्या कोविड मुळे झालेल्या आकस्मिक निधनाच्या धक्क्यातून अद्याप सहकारी बाहेर आलेले नाहीत. जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय आणि अन्य - संघटना - आघाड्यांच्या प्रत्यक्ष कामाबरोबरच आंदोलन अंकात अनिताचे कार्यकर्ता हे सदर सुरु होते. अनिताचे हे लेखन वैशिष्ट्यपूर्ण आणि परिणामकारक होते तसेच लोकप्रियही. आता यापुढे हे लेखन येणार नाही, ही फार मोठी हानी आहे. अनिताच्या निधनाच्या काही दिवस आधीच, अनिताचे आणि आपले जवळचे सहकारी, मार्गदर्शक आणि आंदोलनचे पूर्व संपादक मंडळ सदस्य स्मृतिशेष अरुण ठाकूर यांच्या गौरवार्थ पुस्तकाचे प्रकाशन संपन्न झाले होते. या पुस्तकात स्मृतिशेष अनिता पगारे यांनी अरुण ठाकूर यांच्या संदर्भात लिहिलेला गौरव लेख, कार्यकर्ता या सदरात क्रमशः प्रकाशित करणार आहोत. यातील पहिला भाग या अंकात.

लोकल ट्रेनने कसाऱ्यावरून मुंबईकडे चालले होते. नेहमीप्रमाणे पळत पळत आले, ट्रेनमध्ये आत शिरले आणि ट्रेन सुरू झाली. जागाही सहज मिळाली. पाठीवरची बॅग वरती टाकली आणि सीटवर टेकतच होते तर माझे लक्ष समोरच्या सीटवरच्या मुलीच्या हातातल्या 'टीचर' पुस्तकावर गेले. 'टीचर' पहाताक्षणीच आपण पळत आल्यामुळे दमलो आहोत, आता गाडीत तीन तास बसायचे आहे, नंतर परत त्या मुंबईच्या जीवघेण्या गर्दीत चालायचे आहे हे सगळे थकवा आणणारे विचार गळून पडले आणि एकदम ताजेतवाने वाटायला लागले. समोरची मुलगी तन्मयतेने ते पुस्तक वाचत होती. तिला मी कोण, मला ते पुस्तक पाहून काय वाटतेय, कशाशीच काहीही देणे घेणे नव्हते. 'एक मिनिट हं' असे म्हणत मी तिची तंद्री तोडलीच. बघू ना एक मिनिट, असे म्हणत ती काही म्हणायच्या आत मी ते पुस्तक तिच्या हातातून घेतले होते आणि 'लेखक अरुण ठाकूर' ह्या शब्दांकडे पहात होते.

''अरुणदादाला ओळखता का ?'' तिचा प्रश्न

''हो, मुलगी मी त्याची'' – वरती न पाहता माझे उत्तर.

तिचा चेहराच बदलला. अतिशय कौतुकाने 'किती लकी आहेस' नजरेने मला पहात होती ती. लोकांची कायमच मला अशीच कौतुकाची नजर मिळायची. काही मिनिटे दोघीही शांत, फक्त ट्रेनचा आवाज. नंतर दोघीही एकमेकींकडे हसून पहात एकमेकींची नावे विचारली आणि आपापल्या वाचनात गुंतलो. ती पुन्हा तिच्या तंद्रीत गेली आणि मी माझ्याकडचे पुस्तक उघडले, वाचनाचा प्रयत्न केला. डोळे पुढे पुढे सरकत होते पण वाचलेले समजत नव्हते. बहुतेक डोळेही भरून आले होते. सार्वजनिक ठिकाणी वहायला लागले तर उत्तर काय देणार या भीतीने डोळे मिटले आणि आठवले अरुण पहिल्यांदा कुठे भेटला होता ते.

मी आठवीला असावी तेव्हा. आमचे केळी विकण्याचे दुकान होते. आई दुकानावर बसलेली होती आणि मी आसपासच खेळत होते. तेवढ्यात आईने आवाज दिला आणि ''दादांच्या ऑफिसमधल्या या काकांना आपल्या घरी घेवून जा'' असे सांगितले. ते काका सायकल हातात घेऊन माझ्या सोबत चालले होते. ''तुझं नाव काय ?'' ''अनिता''. ''ही तुझी आई आहे का ?'' ''हो-'' माझे उत्तर. ''अरे बापरे मी मित्राच्या बायकोलाच मावशी म्हंटलो !'' स्वत:शीच हसत अरुणने हे स्वगत केले. आम्ही घरी पोहोचलो. आमचे दादा आराम करत होते. त्यांना असे मधूनच झोपेतून उठवले तरी अरुणचे नाव ऐकताच ते हसतच उठले आणि मोठ्या उत्साहात त्यांनी अरुणचे स्वागत केले. मी दोघांची भेट घडवून परत खेळायला निघून गेली. त्यानंतर अरुण घरी आला पण जुजबी चौकशीपलीकडे त्याचा माझा संवाद कधी झाला नाही.

त्यांनतर मी अकरावीला असताना नाशिकनजीकच्या ओझर गावात होणाऱ्या युवा शिबिराचा फॉर्म माझे वडील घरी घेवून आले. हे मुलामुलींचं एकत्र शिबीर होते. पण त्याच वेळी मी मात्र मला खूप आवडणाऱ्या एन.सी.सी. कॅम्पचा फॉर्म भरला आणि तिकडे निघून गेली. माझी मोठी मामेबहीण आणि तिच्या दोन मैत्रिणी या शिबिरासाठी जाऊन आल्या आणि त्यानंतर

आठच दिवसांत नाशिकला गोळे कॉलनीत कुसुमताई यांच्या महिला हक्क संरक्षण समितीच्या कार्यालयात त्यांच्या बैठका सुरू झाल्या. ताईला एकटीला जायचा कंटाळा यायचा, मिटींगमध्ये पोर-पोरी एकत्र नेमके काय करतात हे माझ्या निमित्ताने घरच्यांना कळावे म्हणून मला ताईबरोबर ह्या बैठकांना पाठवले जायचे. यांच्या बैठका सुरू होत्या आणि मी त्याचा भाग नसल्यामुळे दुसऱ्या खोलीत बैठक कधी संपणार याची वाट पहात बसत असे. एकदा त्यांची काहीतरी चर्चा सुरू होती आणि मध्येच मी काहीतरी बोलले. ''आमच्यात बोलायचे असेल तर आत येऊन बस'' असे अरुणने सांगितले आणि माझा 'समता आंदोलना'त प्रवेश झाला. काही काळानंतर माझी ताई आणि तिच्या मैत्रिणी समता आंदोलनात येईनाशा झाल्या आणि मी मात्र जोडली गेली ती आख्ख्या आयुष्यासाठी.

समता आंदोलन, समाजवादी विचारांचे युवा घडवण्यासाठी, देशातल्या परिवर्तनाच्या चळवळीत नेतृत्व घडवण्यासाठी निर्माण झालेली चळवळ. औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व्हावे यासाठी जी नामांतराची चळवळ महाराष्ट्रात झाली त्यात सेवा दलाने सक्रिय सहभाग घ्यावा असे राष्ट्र सेवा दलात सक्रिय असणाऱ्या अनेक युवांचे म्हणणे होते, आणि सेवा दल ही लहान मुलांच्या संस्कारावर काम करणारी चळवळ आहे; तिने संघटना म्हणून या राजकीय चळवळीत सक्रिय उतरू नये तर त्यातील ज्या ज्या युवांना नामांतराच्या चळवळीत सक्रिय व्हायचे असेल त्यांनी व्हावे असे त्यावेळचे सेवा दलाचे जे नेतृत्व होते त्यांचे म्हणणे होते. त्यावेळच्या चर्चेतून काही निर्णय निश्चित झाला नाही आणि अनेक युवा सेवा दलातून बाहेर पडले. नामांतराच्या चळवळीत जेल मध्ये गेले आणि तिथल्या अभ्यासवर्गात पुढील दिशा काय याच्या ज्या चर्चा झाल्या त्यात ही युवांसाठी युवांनी चालवलेली संघटना जन्माला आली.

अरुण समता आंदोलनाच्या जन्माच्या प्रक्रियेत सक्रिय होता. पुढे ही संघटना समाजवादी जन परिषद या राजकीय पक्षात विलीन होईपर्यंत तो या संघटनेचा 'ब्रेन' घडवण्याचे काम सातत्याने करीत होता. अभ्यासाशिवाय कुठेच जाहीर भाषण करायचे नाही हा अरुणचा अलिखित नियम त्याने आमच्याकडून आयुष्यभर करवून घेतला. समता आंदोलनाच्या पाचही केंद्रांत कुठल्या ना कुठल्या विषयावर संघटन ताकदीने काम करीत होते. मुंबईमधील केंद्र गिरणी कामगारांच्या चळवळीत सक्रिय होते. संगमनेरच्या केंद्राने परित्यक्ता स्त्रियांचे प्रश्न ऐरणीवर आणले आणि शासनाला हा प्रश्न गंभीरपणे लक्ष घालून योग्य ते धोरण स्वीकारायला भाग पाडले. ठाण्याच्या केंद्राने सफाई कामगारांचे प्रश्न लावून धरले, त्या निमित्ताने सफाई कामगारांच्या वस्तीत चांगले संघटन उभे केले. पुण्याच्या केंद्राने वस्त्यांमध्ये संघटना उभी करुन शाळांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले. नाशिक केंद्राने 'गरीबांच्या शिक्षणाचा लढा' उभा केला आणि नाशिक महानगर पालिकेला त्यासाठी धोरणात्मक निर्णय आणि त्यासाठी बजेटमध्ये निश्चित अशी तरतूद करायला भाग पाडले. या सर्व आंदोलनांमध्ये आपली भूमिका काय असावी, ती भूमिका अशी का आहे यासंदर्भातील आमचे सर्वांचे अभ्यासवर्ग अरुण घेत असे. त्यावेळच्या नेतृत्वात असलेले निशा, शिवाजी, सुनीती, संजय मंगला गोपाळ, संजीव साने या सर्वांच्या बरोबरीने अभ्यासाची रसद पुरवण्याचे काम अरुण करीत असे.

अरुणला कुठलाही विषय वर्ज्य नसायचा. कुठल्याही वयाची, कुठल्याही वर्गातली आणि कोणीही व्यक्ती कुठल्याही विषयावर अरुणशी बोलू शकायची, मनातले सांगू शकायची आणि अरुण शांतपणे ऐकून घेत त्या व्यक्तीला मार्ग दाखवत असे. अरुणशी बोललो आणि हलके वाटले नाही किंवा पुढील मार्ग मिळाला नाही असे सांगणारी एकही व्यक्ती मला आजतागायत मिळाली नाही. त्याचे वाचन चौफेर होते. तो मराठीबरोबरच हिंदी आणि इंग्रजीही अगदी सहज वाचायचा. त्याच्या तंद्रीत जगणारा अवलिया होता तो, त्यामुळे कधीही आणि कुठेही भेटल्यानंतर त्याच्याशी संवाद सुरू करायला थोडा वेळ लागायचा. त्याला त्याच्या तंद्रीतून काढून आपल्या विषयावर आणण्यासाठी आपल्यालाच प्रयत्न करावे लागायचे. त्यामुळे काही लोकांना तो सुरुवातीला शिष्ट वाटायचा. पण एकदा का ओळख झाली आणि त्याचा हा प्रॉब्लेम समजला की त्याच्याशी संवाद करणे सोपे जायचे. मग एकदा का तार जुळली की ती मैफिल किती वेळ चालायची हे ना त्याला कळायचे ना ऐकणाऱ्याला. प्रत्येक व्यक्तीकडे काही ना काही ज्ञान असते यावर त्याचा विश्वास होता त्यामुळे त्याची चर्चा कधीच एकतर्फी नसायची. तो कायम ऐकणाऱ्यालाही त्या चर्चेत गुंफायचा, त्यामुळे विचारांचे आदानप्रदान व्हायचे. चर्चेतून जो काही निर्णय व्हायचा तो कोणालाच एकतर्फी वाटत नसायचा.

(संपर्क : कल्याणी अ. म. - ८६२५९१८१८०)

आघाडीवर

दिलासा

राजेंद्र बहाळकर

जगात कोणतीही मोठी घटना घडते किंवा घडविली जाते, महामारीसारखे संकट येते तेव्हा त्याचा सर्वात मोठा फटका गरीबांना - श्रमिकांना बसतो. कोरोनाच्या सध्याच्या दुसऱ्या लाटेतही असंच घडलं आहे. निर्बंध आणि लॉकडाऊनमुळे हातावर पोट असणाऱ्या श्रमिकांचा रोजगार गेलाय. याच वेळेस सरकारी आणि खाजगी कंपन्यांमधील साऱ्या नोकरदारांचा, संघटित क्षेत्रातील साऱ्यांचा वेतन-पगार मात्र सुरूच राहिला आहे. असंघटित क्षेत्रातील रोजगार गमावलेल्या लाखो श्रमिकांना मात्र कुठलेही वेतन नाही, भत्ता नाही, उचल नाही, काहीही नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून सात दशके लोटली तरी असंघटित क्षेत्रातील श्रमिक सगळ्यात जास्त वंचित राहिला आहे, वंचित ठेवला गेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून राज्यात, देशात कुठल्याही पक्षाचे सरकार असले /आले तरी या परिस्थितीत फारसा फरक पडत नाही.

देशातील वंचितांसाठी त्यांच्या लढाया मैदानात येऊन लढणाऱ्या जन आंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाला (एन.ए.पी.एम.) कोरोना संकटात रोजगार गमावलेल्या श्रमिकांसाठी बरीच धडपड करावी लागत आहे.

मोलकरणी - घरेलू कामगार, बांधकामावरील मजूर आदी श्रमिकांची त्या त्या गावा शहरांमधील कामगार कार्यालयांमध्ये नोंदणी करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, ठाणे, नाशिक, वर्धा, उस्मानाबाद आदी प्रमुख शहरांसह अनेक केन्द्रांवर ही मोहीम सातत्यपूर्ण प्रयत्नांमधून राबविली जात आहे. बहुसंख्य श्रमिक कमी शिकलेले किंवा अशिक्षित. त्यामुळे कागदपत्रे जुळवाजुळवीसह फॉर्म भरावयास भरपूर वेळ द्यावा लागत आहे. विविध वस्त्यांवर वारंवार जाऊन साऱ्यांच्या नोंदणीसाठी धडपड सुरू आहे.

पुण्यात एन.ए.पी.एम. कार्यालय आणि इला दलवाई यांचं घर हे तर मोलकरणींना जणू आपले माहेरच वाटत आहे. दिवसभरात आपापल्या सोईने केव्हाही जथ्या जथ्याने या मोलकरणी सख्या अगोदर कळवून किंवा न कळविता देखील सहजपणे येथे येत आहेत. एवढ्या संख्येने येणाऱ्या महिलांमुळे आम्हाला कोरोना होऊ शकेल, अशी भिती व्यक्त करीत एनएपीएम कार्यालय असलेल्या सुनिती सु. र. यांच्या सोसायटीत तक्रार देखील देण्यात आली आहे. ही तक्रार आपण पुरस्कार मानूया!

मोलकरीण सख्या जेव्हा येतात तेव्हा आश्वासक वातावरणामुळे त्यांना खूप बोलावयाचे असते. स्वत: पेक्षा लेकराच्या भविष्यासाठी आणि बरेच काही.. काम नसल्याने घरातला पुरुष बसून आहे आणि घरातल्या साऱ्या जबाबदाऱ्या आपल्या शिरावर घेत या सख्या काहीना काही धडपड करीतच आहेत. तीन वर्षाचे लेकरू पदरात असलेली, २२व्या वर्षी तलाक मिळालेली नसरिन असो की मुलगी झाली म्हणून नवऱ्याने टाकून दिलेली मिनाक्षी, साऱ्यांच्या कहाण्या वेगवेगळ्या, वेदना मात्र सारखीच खूप खोलवरची. पण काम तर पुढे न्यायचे असते आणि संवादाला वेळ पुरत नाही. प्रश्नावली तयार करून सर्वेक्षणाचे प्रयत्न देखील सुरू करण्यात आले आहेत. मुंबईत पुनम कनोजिया व सहकारी वस्त्यांमधून बैठका घेऊन फॉर्म्स भरून घेत आहेत. ठाण्यात जगदीश खैरालिया, सुनिल दिवेकर धडपड करीत आहेत. अजय भोसले व त्याच्या सहकाऱ्यांनी ठाण्यात एका निराधार महिलेस महापालिका आधार केंद्रात पोहोचवण्यासाठी घेतलेल्या यशस्वी प्रयत्नांची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

या श्रमिक संवादातून आणि वस्त्यांमधील संपर्कातून प्रचंड अडचणींचा सामना करावा लागणारी कुटुंबे, तलाकपिडीत आणि परित्यक्ता महिला समोर येत आहेत. गहू किंवा ज्वारी, तांदूळ, डाळ, तेल, साखर, चहा पावडर, मसाला इत्यादी वस्तूंचा समावेश असलेले सुमारे ६५०/- रुपये किंमतीचे रेशनकिट अशा अडचणीतील कुटुंबांना देण्यात येत आहे. समर्थक सहकाऱ्यांकडून रेशनकिटस्साठी देणग्या देखील गोळा होत आहेत.

भ्रष्टाचाराच्या किडीसह का असेना, रेशनवर जाहीर केलेले धान्य मिळत आहे. रेशनकार्डाची आधार नोंदणी झाली असली नसली तरी , संगणकीकरण झाले असले - नसले तरी कष्टकऱ्यांना हक्काचे रेशन मिळवून देण्यासाठी कार्यकर्ते प्रयत्नात आहेत.

कामगार कार्यालयात नोंदणी / नुतनीकरण करून राज्य सरकारने जाहीर केलेली १,५००/- रुपयांची मदत श्रमिकांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य आणि प्रयत्न सुरू आहेत.

खरेतर संघटित क्षेत्राप्रमाणे असंघटित क्षेत्रातील साऱ्या साऱ्या श्रमिकांना किमान वेतन कायद्यामधिल तरतुदींनुसार वेतनासह शाश्वत रोजगार, साप्ताहिक सुट्टी, भविष्य निर्वाह निधी आदी सुविधा सत्वर मिळायला हव्यात. पण आज तरी हे कल्पनेतच आहे. असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या श्रमांची लुट करुनच अनेक धनदांडग्यांच्या संपत्तीत भर घातली जात आहे.

परमिटधारक असो किंवा शिफ्टमधे रिक्षा चालविणारा, कोरोना लाटेत रोजगारावर गदा आलेल्या प्रत्येक रिक्षाचालकाला शासनाची मदत मिळाली पाहिजे, ही आपली स्पष्ट मागणी आहे. तुर्तास परमिटधारक रिक्षाचालकांना शासकीय मदत जाहीर झाली आहे. परिवारातील रिक्षापंचायत संघटनेला बळ देत ही मदत पोहोचण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

एन.ए.पी.एम.च्या सध्याच्या प्रयत्नांमधून असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचे मुलभूत प्रश्न लगेचच सुटू शकणार नाहीत, हे वास्तव आहे. पण या धडपडीतून श्रमिकांना आवश्यक असा दिलासा निश्चितच मिळतो आहे, इतकेच.

rajendrabahalkar@gmail.com

* * *

तमिळनाडूतील तुतुकोडी येथील स्टरलाईट कंपनी विरोधी जन आंदोलनाच्या समर्थनार्थ, जागतिक साखळी उपोषणानंतर आंदोलनास यश!

तमिळनाडूतील तुतुकोडी येथील स्टरलाईट कंपनी विरोधी आंदोलनादरम्यान तमिळनाडू पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १३ नागरिकांच्या झालेल्या हत्याकांडाचा आणि कार्पोरेट-सरकार युतीने केलेल्या दमनाचा आणि हिंसेच्या निषेधार्थ स्टरलाईट विरोधी जनआंदोलनाच्या वतीने संपूर्ण जगभरात दि. १२ ते २२ मे २०२१ दरम्यान साखळी उपोषणात १६०० हून अधीक समर्थकांनी एक दिवस उपोषण करून सहभाग घेतला. यात जन आंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाचे साथीहीसहभागीझाले होते. १४ मे रोजी वेदान्ता कंपनीचे दुष्परिणाम भोगणारे तलवंडी साबो (पंजाब), उदयपूर (राजस्थान), कोरबा (छत्तीसगड) आणि चिंगोला (झांबिया) येथील जनसमूह एका ऑनलाईन सभेमध्ये त्यांच्यावर वेदान्ता कंपनीकडून झालेल्या पर्यावरणीय आणि सामाजिक आघातांबाबत बोलले.

१९९६ साली ही कंपनी सुरू झाली तेव्हापासून तिला स्थानिक लोकांचा तीव्र विरोध होता. १९९७मध्ये झालेली वायुगळती आणि त्यानंतर २०१३ मध्ये मोठ्या प्रमाणावर झालेली गळती; विनापरवाना चाललेले कार्य आणि त्याचा विस्तार; विषारी, धोकादायक उर्वरकांची बेकायदेशीर पद्धतीने लावली जाणारी विल्हेवाट अणि अनेक नियम-कायद्यांची उल्लंघने, ही या कंपनीची कार्यपद्धती होती. हा सरळसरळ फसवणूक, बेकायदेशीर व्यवहार, प्रदूषणाचा गुन्हा असूनही या गंभीर फौजदारी गुन्ह्यांच्या विरोधात वेदान्ता कंपनीवर अथवा तिच्या संचालकांवर सरकारने एकही गुन्हा दाखल केलेला नाही.

स्टरलाईट कंपनीच्या विरोधात मागील सुमारे तीन दशके जनआंदोलन चालू आहे.जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचा यात प्रथम पासून सक्रीय सहभाग आहे. धरणी, मोर्चे, न्यायालयीन लढाई, अशा अनेक संवैधानिक मार्गांनी स्थानिक लोक आपला असंतोष व्यक्त करत होते. २२ मे २०१८ रोजी तमिळनाडू पोलिसांनी केलेल्या गोळीबारात वेदान्ता कंपनीच्या या स्टरलाईट कंपनीच्या प्रदूषणाविरोधात आंदोलन करणाऱ्या १३ नागरिकांचा बळी गेला तर शेकडो जखमी झाले. त्या घटनेनंतर उसळलेल्या जनक्षोभामुळे राज्य सरकारच्या आदेशानुसार कंपनीचे काम जरी बंद पडले.

तुतुकोडी हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या झालेल्या उद्रेकानंतर तेव्हापासून बंद असलेल्या स्टरलाईट कंपनीला आता ऑक्सीजन निर्मितीचे कंत्राट देऊन पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न चालू आहे. हे सरळसरळ कार्पोरेट-सरकारच्या अभद्र युतीचे कारस्थान आहे. वेदान्तासारख्या हिंसक, दमनकारी, गुन्हेगार, स्थानिक लोकांचा तीव्र विरोध असलेल्या आणि त्या संपूर्ण परिसराला उध्वस्त करणाऱ्या कंपनीशिवाय या ऑक्सीजननिर्मितीसाठी सरकारला अन्य कोणतीही कंपनी सापडली नाही काय, हा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत.

नवीन राज्य सरकारने या आंदोलनाची दखल घेऊन, सदर कंपनी येथे पुन्हा सुरू होणार नाही तसेच आंदोलकां वरील खोटे खटले मागे घेण्यात येतील, असे अलीकडेच जाहीर केले आहे. आंदोलनाचे हे मोठेच यश आहे.

प्रतिनिधी

आघाडीवर

‘पुष्पा भावे : विचार आणि वारसा’ पुस्तक प्रकाशन

ऋजुता खरे

पुष्पा भावे म्हणजे संघर्ष आणि चळवळींशी जोडलेलं नाव. साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक परिवारासाठी पुष्पाबाई हे जिव्हाळ्याचं, आदराचं आणि प्रेरणेचं स्थान होतं. ३ ऑक्टोबर २०२० रोजी त्यांचं दु:खद निधन झालं आणि त्यांचे असंख्य विद्यार्थी, कार्यकर्ते आणि सहकाऱ्यांच्यात पोरकेपणाची जाणीव निर्माण झाली. पुष्पा भावेंसारखी माणसं आपले विचार, तत्त्वं, व्यासंग आणि असंख्य आठवणींचं संचित मागे ठेवून जातात. हा सगळा वारसा जतन करण्याच्या प्रेरणेनं साने गुरुजी स्मारक ट्रस्टचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी कामाला लागले आणि गणेश विसपुते व वैशाली रोडे या अनुभवी संपादकांच्या नेतृत्वाखाली ‘पुष्पा भावे : विचार आणि वारसा’ या नावाचा देखणा ग्रंथ निर्माण करण्याचं काम सुरू झालं. करोनाच्या सावटाखाली काम करताना अनेक अडचणींना तोंड देत हा ग्रंथ तयार झाला आणि ११ एप्रिल २०२१ रोजी सध्याच्या रिवाजानुसार झूम आणि फेसबुक लाइव्हच्या माध्यमातून त्याचं प्रकाशन करण्यात आलं. सत्यशोधक विचारांशी बांधिलकी ठेवून पुष्पाबाईंसोबत अनेक वर्षं कार्यरत असणारे जेष्ठतम सहकारी बाबा आढाव, विख्यात प्रकाशक-लेखक आणि पुष्पा भावेंचे स्नेही रामदास भटकळ, सामाजिक कृतज्ञता निधीचे कार्यवाह सुभाष वारे, साने गुरुजी स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. संजय मं. गो., आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्राच्या अध्यक्ष नीरजा, मायमावशीचे संपादक गणेश विसपुते अशा मान्यवरांच्या उपस्थितीत हा नेटका सोहोळा पार पडला. स्मारक परिवारातले जेष्ठ सदस्य गजानन खातू, अनंत भावे यांच्यासह पुष्पा भावेंवर प्रेम करणाऱ्या आणि लोकशाही, समता, न्याय या तत्वांशी बांधिलकी मानणाऱ्या हजारो लोकांनी फेसबुकच्या माध्यमातून यात सहभाग घेतला ही खरोखरच अभिमानास्पद गोष्ट आहे.

कार्यक्रमाच्या सुरवातीला ग्रंथनिर्मितीमागची भूमिका सांगताना गणेश विसपुते म्हणाले की ‘‘आपल्याला वैचारिक बळ आणि ऊर्जा पुरवणारी पुष्पा भावेंसारखी माणसं म्हणजे दीपस्तंभ असतात, त्यांना गमावल्यानंतर सैरभैर होणं साहजिकच. पुष्पाताईंसारख्या बहुमुखी व्यक्तिमत्वाचे विचार, अनेक क्षेत्रातलं त्यांचं कार्य याचं दस्तऐवजीकरण करायलाच हवं असं प्रकर्षानं जाणवलं आणि मायमावशीचा ‘पुष्पा भावे’ विशेषांक करण्याच्या दृष्टीनं जुळणी सुरू झाली. प्रत्यक्षात त्यांचे विद्यार्थी, सहकारी आणि स्नेही यांच्याकडून इतका वैविध्यपूर्ण मजकूर आमच्याकडे आला आणि त्यातूनच हा स्मृतिग्रंथ साकार झाला. पुष्पाताईंच्या विचारांना स्वातंत्र्य, न्याय, लोकशाही यांचं अधिष्ठान होतं, हा वारसा पुढच्या पिढीला सांगणं हे आपलं कर्तव्य आहे आणि म्हणून हा ग्रंथ निर्माण केल्याचं समाधान आहे.’’

‘‘सामाजिक कृतज्ञता निधीच्या कार्यकर्ता शिबिरासाठी पुष्पा भावे येणार आहेत असं कळलं की आम्ही निश्चिंत होत असू. पुष्पाताई या शिबिरात आपल्या सत्राव्यतिरिक्त इतर वेळात कार्यकर्त्यांशी जो मुक्त संवाद साधत असत तो अतिशय मौल्यवान होता. वाचनाच्या जोडीला माणसांशी संवाद साधत, त्यांच्याशी नातं जोडत आपल्या विचारांची शिदोरी जमावणाऱ्या पुष्पाताई कार्यकर्त्या-विचारवंत होत्या, त्यांचे विचार नेहमी जिवंत असत. त्यांची शांत, संयत मांडणी ऐकणाऱ्याच्या मनावर अक्षरश: कोरली जात असे. नव्या पिढीने त्यांच्याकडून काही घ्यायचे असेल तर तो निर्भयपणा, जे योग्य आहे त्याला योग्य म्हणण्याचा परखडपणा घ्यावा. एखादी घटना घडल्यानंतर राजकीय पक्ष त्यावर ताबडतोब अभिनिवेशपूर्ण भूमिका घेत. अशावेळी आम्ही कार्यकर्ते मात्र पुष्पाताई यावर काय म्हणतात याची वाट पाहत असू; कारण एखाद्या फुलाच्या पाकळ्या उलगडत जाव्यात तसे त्या विषयाचे सर्व पैलू उलगडून मगच त्या आपली सडेतोड भूमिका मांडत असत. सत्तेत कोण आहे याचा विचार न करता सत्याची बाजू घेणारे जागले समाजाला दिशा देत असतात, पुष्पा भावे या अशाच आघाडीच्या जागल्या होत्या. आताच्या काळात अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होत असताना, कष्टकऱ्यांचे हक्क

डावलले जात असताना त्यांच्या निर्भयपणाची सर्वाधिक गरज आहे. त्यांची ही वृत्ती आपल्या अंगी बाणवण्याचा आपणही निश्चित प्रयत्न करूया'' असा आशावाद सुभाष वारे यांनी बोलताना व्यक्त केला.

पुष्पा भावे आणि साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाचा स्नेहबंध जुना आहे. म्हणूनच या पुस्तकाच्या निर्मितीसाठी स्मारकाच्या सर्वच कार्यकर्त्यांनी तळमळीने काम केलं. आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्र आणि मायमावशीच्या माध्यमातून पुष्पाताईंसोबत काम केलेल्या नीरजा यांनी त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलगडून दाखवले. नीरजा म्हणाल्या, ''अभ्यासू, विद्यार्थी घडवणारी शिक्षिका, साहित्य नाट्य क्षेत्रावर परखड भाष्य करणाऱ्या, प्रत्येक आंदोलनात, ठामपणे, निर्भयपणे संयतपणे बोलणाऱ्या वक्त्या, दुर्गाबाईंच्या नंतर भूमिका घेणाऱ्या आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा, धर्मचिकित्सेचा पुरस्कार करणाऱ्या, जात-लिंगाधारित शोषणाची चिकित्सा करणाऱ्या, प्रत्येक आंदोलनात उतरणाऱ्या म्हणून पुष्पा भावे आपल्याला परिचित आहेत. 'निर्भय, प्रागतिक वारसा जपणाऱ्या आणि तोच वारसा इतरांना देणाऱ्या, लढाऊ बाण्याच्या, विचारांचं लेणं कोरणाऱ्या, खंबीर, आश्वासक आधार असणाऱ्या, लोकशाही मूल्यांची जपणूक करणाऱ्या, पुरोगामी चळवळीचा चेहरा, नेमकं आणि ठाम भाष्य करणाऱ्या, निरंतर संघर्ष करणाऱ्या, संस्कृतीच्या कृतिशील भाष्यकार, लखलखीत बुद्धीची विचारशलाका,काळाच्या पुढे चालणाऱ्या, वादळी तरीही संयत, नाट्यगुरू' अशी अनेकविध विशेषणं या पुस्तकातील लेखांतून वापरण्यात आलेली आहेत. या सर्वांच्या पलीकडे त्यांच्यात लपलेली हळवी आणि अवखळ मुलगी आपल्याला फार परिचित नसली तरी त्यांची जिवलग मैत्रीण सरोज देशपांडे यांच्या लेखातून त्याची एक झलक पाहायला मिळते. या पुस्तकातल्या छायाचित्रांतून त्यांच्या अनेक बोलक्या भावमुद्रा टिपलेल्या पाहायला मिळतात. प्रत्येक मूर्तिकार हा शिल्पकार होऊ शकत नाही. मात्र पुष्पा भावे या खचितच अनेक पिढ्या घडवणाऱ्या, नवा विचार देणाऱ्या शिल्पकार होत्या. आदर्शांच्या शोधात असणाऱ्या नव्या पिढीसाठी हे पुस्तक म्हणजे अशी आदर्शवत माणसं असू शकतात हा विश्वास देण्यासारखंच आहे, आणि साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाकडून या पुस्तकाची निर्मिती झाली याचं मला खूप समाधान वाटतं.''

रामदास भटकळ आणि पुष्पा भावे यांचा सुमारे पासष्ठ वर्षं इतका गाढा स्नेह होता. कॉलेजजीवन, नाटक, लेखन, आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्र अशा अनेक क्षेत्रात त्यांनी एकत्र काम केलेलं आहे. पुष्पाताईंबद्दल बोलताना ते म्हणाले ''एखाद्या वाटेवर पुष्पा जात आहे तर मग मी पण तिच्या मागे दोन पावलं जायला हरकत नाही असा विश्वास तिच्याबद्दल वाटत असे. तिनं अनेक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करून दाखवल्या आणि त्यासाठी लागणारं धैर्य, ऊर्जा, मानसिक-बौद्धिक तयारी हे सगळं तिच्याकडे होतं. तिच्यासाठी वापरली गेलेली विशेषणं म्हणजे केवळ गुळगुळीत झालेले शब्द नसून त्यांना खरा अर्थ आहे. आताच्या कठीण काळात पुष्पा आहे याचा मोठा आधार वाटत असे. मोठ्या व्यक्तींच्या कार्याचा विचार करताना त्यांचा समाजावर किंवा वेळप्रसंगी विरोधकांवर देखील काय परिणाम झाला हे महत्वाचं ठरतं. पुष्पा भावे यांनी ज्या विषयांत मूलभूत काम केलं त्या विषयांवर नव्या लोकांना स्वतंत्रपणे लिहितं केलं तर हा परिणाम समजून घेणं सोपं होईल. या उत्कृष्ट स्मृतिग्रंथाच्या निर्मितीनंतर नाट्यसमीक्षा, साहित्य, समाजवादी विचारधारा, स्त्रियांचे प्रश्न, सामाजिक कृतज्ञता निधी अशा ज्या ज्या विषयांमध्ये पुष्पा भावे यांनी काम केलेलं आहे त्या सर्व विषयांवर स्वतंत्र लेखन असणारा ग्रंथ निर्माण होणं आवश्यक असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

पुष्पाताईंच्या व्यक्तिमत्वात, त्यांच्या विचारांत आणि मांडणीत एक बांधेसूदपणा होता. एखाद्या समाजाची नाडी कशी ओळखायची हे सांगताना बर्ट्रांड रसेल चिंतनशीलता आणि कलात्मक सर्जनशीलता असे दोन निकष सांगतो; आणि पुष्पा भावे यांच्याकडे हे दोन्ही होतं. त्यांना कधीही नेतृत्वाची आस नव्हती. त्यांच्या बोलण्यात अभिनिवेश नव्हता, परंतु त्यांच्या बोलण्यात श्रोत्यांना विचारप्रवृत्त करण्याची ताकद होती. त्यांच्यात कृतिशील विचारवंतांची स्वाभाविकता होती. अभिव्यक्तिस्वातंत्र्य, सत्य यांचा आग्रह धरणाऱ्या पुष्पाताई एका आदर्श समाजाचं चित्र रेखाटणाऱ्या कलाकार होत्या असे सांगत कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी बाबा आढाव यांनी पुष्पाताईंच्या आठवणी जागवतानाच इथून पुढे लोकशाहीवादी, समाजवादी विचारप्रवाहांची दिशा कशी असली

(पान ३६ वर)

निवेदन

पर्यावरणीय महासंकट व वंचितांचे हक्क

एस.ए.पी.ए.सी.सी म्हणजे साऊथ एशियन पीपल्स ॲक्शन् ऑन क्लायमेट क्रायसेस या (सहा देशांच्या) संघटनेने दि. २१ एप्रिल २०२१ रोजी निवेदन पाठवून आपल्या तीन सदस्य देशांच्या प्रमुखांना ठणकावले की, ''पर्यावरणाच्या महासंकटातून वंचित समुहांना वचविण्यासाठी ठोस लोकसहभागी कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करा! केवळ घोषणा नकोत!!'' अमेरिकेचे नवे अध्यक्ष जो बायडन यांनी पुढाकार घेऊन पृथ्वीदिनाच्या निमित्ताने दि २२ व २३ एप्रिल २०२१ ला आयोजित केलेल्या व्हर्चूअल समिट ऑंन क्लायमेट क्रायसिस या महत्वाच्या चर्चासत्रांत, भारत, बंगलादेश व भुतान या तीन देशांच्या प्रमुखांना आमंत्रित करण्यात आले आहे.नोव्हेंबर २०२० मधील अपेक्षित सी.ओ.पी-२६ पुढे ढकलण्यात आले होते म्हणून या समिटचे विशेष महत्त्व मानले जाते, कारण जरी हा समिट यु.एन.एफ.सी.सी.सी. (United Nations Framework Convention on Climate Change)च्या पारंपारिक चौकटीच्या बाहेर असला तरी या निमित्ताने ऐतिहासिक दृष्टीने जगातील सर्वाधिक प्रदुषक असलेले राष्ट्र अमेरीका, हे काहीशा गांभीर्याने सकारात्मक पाऊले उचलू पाहते आहे. त्याबद्दल निश्चितच आनंद व्यक्त करायला हवा.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविलेल्या पत्रांत असे म्हटले आहे की आमचे प्रतिनीधी म्हणून या समिटला जातांना तुम्ही दक्षिण आशियायी देशांतील जास्तीत जास्त जनतेच्या चिंता पोहचवाल अशी आम्ही अपेक्षा करतो. सर्वांत महत्वाचा मुद्दा असा की ज्या समाजांना या पर्यावरणीय संकटाचा आघात सर्वाधिक भोगावा लागेल पण ज्यांच्याकडे याला तोंड देण्याकरिता काहीही साधने नाहीत त्यांचा आवाज तुम्हाला पोहचवायला हवा आणि या वंचित समुहांना किमान दर्जेदार व सुरक्षित जीवन जगण्याची शाश्वती मिळण्याची अत्यंत तातडीची निकड तुम्ही प्रभावीपणे मांडायला हवी. आम्हा दक्षिण आशियातील जनसमुहांना मानवीय विकासाची बरीच वरची पातळी गाठायची आहे पण आमचे जीवनआधार असलेल्या नैसर्गिक संसाधनांचा आम्हाला सर्वनाश होऊ द्यायचा नाही.

दक्षिण आशिया हा भू-संस्कृतिक प्रदेश, हिमालयीन पर्वतरांगा, तीन सागर, दक्षिण-पश्चिम-मान्सून, अनेक नद्या व जंगले जी विविध देशांच्यात पसरलेली आहेत या सर्वांमुळे जोडलेला आहे. इथल्या जनसमुहांत आनुवंशिक व सांस्कृतिक जवळीक आहे. पर्यावरणीय संकटाचा सामना आम्ही एकजुटीनेच करायला हवा.

माननीय महोदय आपण जाणता की, अनेक अध्ययनातून हे स्पष्ट झाले आहे की सब सहारन आफ्रिका व दक्षिण आशिया हे दोन पर्यावरणीय गोंधळाच्या संकटामुळे सर्वाधिक प्रभावित होणार आहेत. नैसर्गिक संसाधनांवर अधिक अवलंबित असणे व निम्न आर्थिक स्तर यामुळे अनेक विकसित देशांच्या तुलनेत आपली पर्यावरणीय संकटाला सामोरे जाण्याची क्षमता कमी आहे. याकरिता ऐतिहासिक सामाजिक अन्याय व कोळसा व खनिज आधारित विकासाच्या शर्यतीत पुढे असणारे देश जबाबदार आहेत.

सध्याच्या हरितगृह वायु उत्सर्जन वाढीचा दर पाहता, अगदी छोट्या दशकभरांत जगाचे तापमान औद्योगिक पूर्व पातळीपेक्षा १.५ ते २ डीग्री सें. ने वाढण्याचे भाकित आहे. या पलिकडे तपमान वाढल्यास आपला ग्रह बहुतांश सजीवांसाठी जगण्यायोग्य उरणार नाही, याबद्दल सर्व अंतरराष्ट्रीय वैज्ञानिक गटांत एकवाक्यता आहे. हे भयानक पर्यावरणीय संकट टाळायचे असेल तर २०३० पर्यंतच्या दशकांत आपल्याला जागतिक उत्सर्जन निम्म्याने कमी करायला हवे. तसेच आपल्या विविध खाद्यसंस्कृती टिकवण्याकरिता जागतिक जैवविविधता आवश्यक आहे, त्याबद्दल दुसऱ्या एका अभ्यासात सांगितले आहे की, परागिकरण करणाऱ्या किटकांच्या प्रजातींवर

या संकटामुळे फारच घातक परिणाम होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणांत प्रजाती कायम स्वरुपी नष्ट होत आहेत. आपण जागतिक तापमान वाढ १.५ डिग्री सें ला थोपवण्याची संधी हुकवण्याच्या किनाऱ्यावर आहोत असे विविध अभ्यासातून उघड झाले आहे. मागील वर्षभर जागतिक आर्थिक मंदी असूनदेखिल आपण १.२ डिग्रीचा टप्पा आधीच पार केलेला आहे. जर १.५ डीग्रीची लाल रेषा नुसती ओलांडली, तरी सुद्धा दक्षिण आशियातील वंचित समुहांना अगणित हालअपेष्टा भोगाव्या लागतील.

आत्ता *आपण अशा पर्यावरणीय संकटाला सामोरे जातो आहोत की पर्यावरणीय विनाश टाळण्याकरिता तातडीने व महत्वाची पाऊले उचलणे गरजेचे आहे*

विकसित देशांनी मानवी विकास व आर्थिक प्रगतीचा उच्चस्तर गाठण्याकरिता खनीज इंधनांचा भरपूर वापर केला व त्यामुळेच हे पर्यावरणीय संकट संपूर्ण जगासमोर उभे राहीले आहे.आज जगातील केवळ १७ टक्के जनसंख्या असलेल्या श्रीमंत देशांनी १८व्या दशकापासून एकंदर उत्सर्जनाच्या ६० टक्के उत्सर्जन केलेले आहे. त्यांचे दर डोई ऐतिहासिक उत्सर्जन हे अविकसित देशांच्या किमान बारापट अधिक राहीलेले आहे. आताच्या वाढत्या जागतिक विषमतेच्या काळांत गरीब देशांना नजीकच्या काळांत तरी विकसित देशांची बरोबरी करता येण्याची अजिबात आशा नाही.

दक्षिण आशियातील जनतेचा एकंदर जागतिक उत्सर्जनातील वाटा हा जेमतेम ३.५ टक्के आहे, मात्र त्यांनाच सर्वाधिक पर्यावरणीय दुष्परिणाम भोगावे लागणार आहेत. जगातील एक चतुर्थांश लोकांना जगविणाऱ्या या फक्त ३.५ टक्के जमीन असलेल्या दक्षिण आशियातील देशांकडे मागे सरकण्याकरिता-आसरा शोधण्याकरिता जमीनच नाही.

सन् १९९२ च्या अर्थ समिट मध्ये मान्य केलेल्या सी बी डी आर् व आर् सी (Common But Differentiated Responsibility and Respective Capacities) या तत्वानुसार श्रीमंत विकसित उत्तरेकडील देशांनी असे उपाय योजण्याची जास्त जबाबदारी घ्यायला हवी की ज्यामुळे उत्सर्जन नियंत्रित करण्यांत येतील तसेच वंचित समुहांना येणाऱ्या पर्यावरणीय संकटाच्या परिणामांना सामोरे जात तगून राहण्यासाठी मदत उभी करावी लागेल. तसेंच दक्षिणेतील देशांनी सुद्धा त्यांच्या देशातील श्रीमंत लोकांना उत्सर्जन कमी करण्याकरिता व वंचित समुहांच्या मदतीकरिता त्यांच्या सर्वाधिक क्षमतेनुसार पुढे येण्यासाठी प्रोत्साहीत करायला हवे.

पर्यावरणाला धोकादायक उत्सर्जन कमी करणे तसेच पर्यावरणीय संकटाच्या दुष्परिणामांशी टक्कर घेण्यासाठी लोकांना सक्षम करणे या दोन्हीची तातडीची गरज असल्यामुळे आम्ही अपेक्षा करतो की आपण खालील मागण्या येत्या समिटमध्ये आग्रहपूर्वक मांडाव्यात.

१. आपला ग्रह पर्यावरणीय संकटांत आहे असे घोषित करा आणि केवळ यु.एन.एफ.सी.सी. याच मंचावर नव्हे तर युनायटेड नेशन्स (यु.एन.)च्या सर्व प्रकारच्या कार्यक्रम पत्रिकामध्ये या मुद्याला सर्वोच्च स्थान द्या. जागतिक,राष्ट्रीय व स्थानिक अशा सर्व स्तरांवरील, संपूर्ण निर्णय प्रक्रियेत लोकसहभाग घेऊन, कृतिकार्यक्रम तयार करा व त्यांची अंमलबजावणी करा. सर्वमान्य मानवी हक्कांचा सन्मान करण्यांत येईल व त्यांना प्राधान्य दिले जाईल याबद्दल दक्षता घ्या.

२. पर्यावरणाचा विनाश करणाऱ्या कोळशाचा वापर सन् २०३५ च्या तर तेल व वायुचा २०४५ च्या आत क्रमश: कमी करण्याचा जागतिक कार्यक्रम तयार करा. सन् २०५०, ही जी आय् पी सी सी सह विविध पर्यावरणीय अभ्यास गटांनी दिलेली धोक्याची चकचकणारी लाल रेषा आहे, त्याआधी मानवी समुदायाने कार्बन न्यूट्रल होणे गरजेचे आहे. यात आपण अपयशी झालो तर पर्यावरणीय महासंकट निश्चितच ओढवेल. हे टाळायचे तर जागतिक खनीज इंधन साठ्याच्या ८० टक्के साठ्याला धक्का न लावला जावा याकरिता यंत्रणा उभारा. उर्जास्रोतांत बदल करण्यासाठी गरीब राष्ट्रांना सर्व आधार दिला जाईल ह्याची निश्चिती करा.

३. खनीज इंधन व चैनीकरिता सेवा देणाऱ्या, संपूर्ण जागतिक ऊर्जा व पायाभूत सुविधांसाठी वित्तपुरवठा करणाऱ्या सर्व संस्थाना निर्देश द्या की, सुरक्षित-शून्य

उत्सर्जन उर्जा स्त्रोत व त्यानुसार योग्य व ताकदवान पायाभूत यंत्रणा उभारा. बहुराष्ट्रीय, द्विराष्ट्रीय व राष्ट्रीय अशा सर्व मोठ्या वित्त संस्थांना असे निर्देश द्या की त्यांनी ४० टक्के गुंतवणूक ही पर्यावरणीय संकटाला सामोरे जाण्याकरिताच्या प्रयत्नामध्ये करावी व त्यांत नुकसानभरपाई (मिटीगेशन) व परिस्थितीशी जुळवून घेणे (ॲडॉप्टेशन) या दोन्ही गोष्टींवर सारखाचा भर असावा.

४. पर्यावरणीय संकट हे मुख्यत: विकसित - श्रीमंत राष्ट्रांमुळे ओढविले असून आमच्या देशातील लाखो गरीब वंचितांना दरवर्षी या संकटांच्या भयानक परिणांमांना सामोरे जावे लागते. त्यामुळे गरीबांना होणाऱ्या या नुकसानीची व हानीची पुरेशी भरपाई देण्याची जबाबदारी श्रीमंत - विकसित देशांनी स्विकारावी. पूर्वी मान्य केलेली पण कधीच न दिलेली स्वत.च्या जी.डी.पी.च्या ०.७ टक्के रक्कम यासह अधिक रक्कम त्यांनी गरीब राष्ट्रांना द्यावी. ही प्रक्रिया पारदर्शक असावी व अन्य विकास निधीच्या पेक्षा अधिक व तातडीने पूर्ण करण्यात यावी.

५. जमीन,देशांतर्गत विविध जलस्त्रोत (नद्या,तलाव) व सागर या आधारे अन्न उत्पादनाच्या पध्दतींना संरक्षित (सुरक्षित) करणारे तसेंच प्राथमिक अन्न उत्पादक व ग्राहक यांच्या आवश्यकतांशी सुसंगत असे आराखडे तयार करा व लागू करा. या क्षेत्राशी मोठ्या व्यापाऱ्यांची व अन्य गुतवणुकदारांची पोहोच फारच मर्यादित करा अथवा बंद करा, कारण अन्न ही जगण्याकरिता कळीची गरज तर आहेच, तसेंच त्याला येऊ घातलेल्या पर्यावरणीय संकटाने मोठा धोका निर्णाण झालेला आहे.

६. अशी जागतिक कर प्रणाली तयार करा की जी ऊर्जा वापर व अधिक उर्जेचा वापर करून तयार केलेल्या वस्तु, ज्या साधारणपणे चैनीच्याच वस्तु व सेवा असतात व ज्यांचे पर्यावरणावर घातक परिणाम होतात यावर कर गोळा करेल. जागतिक कर माफी काढून टाकणारे कर-आराखडे तयार करा व त्यांची अंमलबजावणी करा.

७. ऊर्जा व वस्तुंचा वापर याबद्दलची विविध देशांमधली तसेंच समाजातली विषमता मोठ्याप्रमाणांत दूर करण्याकरिता परिणामकारक पाऊले उचला. यासाठी फेरवाटप करणारी आर्थिक धोरणे राबवा. हे पाऊल उत्सर्जन वाढ कमी करण्याइतकेच महत्त्वाचे आहे.

८. आर्क्टिक प्रदेश, मोठे पर्वत, समुद्रकिनारे व खोलसमुद्र यासारख्या जागतिक स्तरावर पर्यावरणीय दृष्टीने महत्वाच्या क्षेत्रांमध्ये खनन व औद्योगिक स्तरावरचे शोषण तात्काळ थांबवा व ही ठिकाणे वाचविण्याकरिता परिणामकारक पाऊले उचला. असे करताना सामायिक संसाधनांवर ज्यांची छोटी उपजीविका अवलंबून आहे त्याना त्यावर जगू द्या. या क्षेत्रांचे संरक्षण करणे गरजेचे.

९. सन् २०३५ पर्यंत श्रीमंत-विकसित देशांनी त्यांचे हरित गृह वायु उत्सर्जन शून्यावर आणणे व विकसनशील व गरीब देशांना २०४५ पर्यंतच तसे करता यावे म्हणून आर्थिक, तांत्रिक व ज्ञान या सर्वप्रकाराने मदत करण्याची बांधिलकी मानून मदत करण्यासाठी परिणामकारक आराखडे तयार करा. आंतरराष्ट्रीय प्रवास व सामायिक आर्थिक कृतींमुळे होणारे बाकी उत्सर्जन देखिल २०५० पर्यंत काढून टाकले जावे. हरित पर्यावरण फंड, अनुकुलन फंड, जी.ई.एफ. इत्यादींची निर्मिती याच उद्देशाने करण्यांत आली. पण ते त्यानुसार झाले नाही.आता मात्र ते अधिक फंड व कृतींनी कार्यान्वित करावे लागतील.

१०. निसर्गाचे अधिकार हे मूलभूत अधिकार असे जाहीर करा व याचा सर्व संविधानांमध्ये व आदेशांमध्ये (स्टॅट्युटस्) समावेश करा. कोणती नैसर्गिक संसाधने अतिशय धोक्यांत आली आहेत हे ओळखा व निसर्गाचे हक्क पुनर्स्थापित करणे व पुनरुज्जीवित करणे याकरिता कमीतकमी यांत्रिक हस्तक्षेप करावा लागेल असे परिणामकारक आराखडे तयार करा व त्यांची अंमलबजावणी करा.

अनुवाद: डॉ. सुहास कोल्हेकर
kolhekar.suhas@gmail.com

टिप्पणी

सेंट्रल व्हिस्टा : मुद्दा विवेकाचा, प्राधान्यक्रमाचा आणि हेतूचा!

सगळा देश कोविडच्या दुसऱ्या लाटेत होरपळून निघत असताना आणि ऑक्सीजन, व्हॅंटिलेटर्स, शववाहिका, सुसज्ज हॉस्पिटल्स ही सारी यंत्रणा अत्यावश्यक असताना दिल्लीमध्ये मात्र 'अत्यावश्यक सेवे'चा दर्जा देण्यात आला आहे 'सेंट्रल व्हिस्टा' या महत्वाकांक्षी प्रकल्पाला. दिल्लीच्या मध्यवर्ती भागात, तब्बल साडेतीन किलोमीटर्स परिसरात या प्रकल्पाचे खोदकाम चालू आहे. येथे संसद भवन, पंतप्रधानांचे निवासस्थान, उपराष्ट्रपतींचे निवासस्थान, केंद्र सरकारचे सचिवालय, खासदारांची कार्यालये असे सारे काही नवे निर्माण होणार आहे. राजपथ ते जनपथ या भागात जमिनीच्या खालीही विद्युत रोषणाई, कारंजी, बागा, पार्किंग, स्वच्छतागृहे, पाण्याची व्यवस्था, असा सारा थाट असणार आहे. हा प्रकल्प २०२२ ते २०२४ दरम्यान पूर्ण करण्याची घाई मोदी सरकारला झाली आहे. हे काम वेळेत पूर्ण व्हावे यासाठी या प्रकल्पाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा देण्यात आला आहे आणि त्यासाठी २०००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या प्रकल्पासाठी सध्या रात्रंदिवस मजूर राबत आहेत. दिल्लीमध्ये कडकडीत लॉकडाऊन असताना या 'अत्यावश्यक सेवे'साठी मात्र दिल्ली पोलिसांनी (- जे केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहेत -) १८० गाड्यांची परवानगी दिली आहे. दोन किंवा तीनही शिफ्ट्समध्ये ६ ठिकाणी मिळून सुमारे दोनअडीचशे मजूर काम करत आहेत. हे मजूर बंगाल, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेशातून आले आहेत.

तीन कारणांसाठी या निर्माणकार्याची घाई आक्षेपार्ह ठरते.

एकतर, देशावरील या भयंकर संकटकाळात, जो काळ कधी संपेल, किती विक्राळ रूप धारण करेल त्याचा काहीही अंदाज नाही अशा संकटकाळात, अशाप्रकारचा भव्य प्रकल्प हाती घ्यावा का, हा पहिला प्रश्न. लाखो लोक मृत्यूच्या छायेत असताना; गंगेतून हजारो प्रेते वाहत असताना; स्मशाने अपुरी पडल्यामुळे मोकळ्या मैदानांमध्ये अनेक चिता एकाच वेळी धडाडत असल्याचे दृश्य असताना; दु:ख, भय, अनिश्चिततेचे सावट देशावर पसरलेले असताना या महत्वाकांक्षी आणि महागड्या प्रकल्पाची घाई कशासाठी?

दुसरा मुद्दा – देशात आरोग्यसेवेसाठी, लसीकरणासाठी मोठी यंत्रणा उभी करण्याची गरज असताना; कोविडच्या विळख्यात सापडलेल्या रुग्णांना विनामूल्य आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याची आणि मृत्युमुखी पडणाऱ्यांच्या कुटुंबियांना सांत्वनासोबतच आर्थिक सहाय्य देण्याची गरज असताना; शर्थीने झुंजणाऱ्या कोविड योध्यांसाठी सुरक्षेसोबतच आर्थिक तरतूद करण्याची तातडी असताना; लॉकडाऊनमध्ये रोजगार गमावलेल्यांना अन्न, निवारा आणि दिलासा देण्याची गरज असताना, हाच पैसा तिकडे वळवता आला नसता काय?

तिसरा महत्वाचा मुद्दा, या प्रकल्पाखाली जाणाऱ्या ऐतिहासिक वारशाचा. जेथे हा प्रकल्प होतो आहे तेथे अतिशय महत्वाच्या अशा ऐतिहासिक वास्तू आहेत. त्या साऱ्या नामशेष करून त्यावर हा प्रकल्प उभारला जाणार आहे. भारतीय राष्ट्रीय संग्रहालय - नॅशनल म्युझियम ऑफ इंडिया, इंदिरा गांधी नॅशनल सेंटर फॉर आर्ट्स (आयजीएनसीए) आणि नॅशनल आकाईव्हज या इमारती भुईसपाट करून नव्या बांधकामासाठी जागा तयार करण्यात येणार आहे.

या संदर्भात ७६ अभ्यासक, कलाकार, लेखक, संग्रहालयांचे संचालक आणि संग्रहालय व्यावसायिकांनी एक पत्र लिहून काही महत्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. हा प्रकल्प त्वरित स्थगित करावा आणि पुढच्या निर्णयाआधी त्यावर व्यापक सार्वजनिक चर्चा करावी अशी मागणी या तज्ज्ञांनी केली आहे. या वास्तूंमध्ये असलेल्या संग्रहित वस्तूंच्या संरक्षणाविषयी त्यांनी रास्त शंका उपस्थित केल्या आहेत. राष्ट्रीय संग्रहालयातला खजिना, नॅशनल अकाईव्हजमधील दस्तावेज आणि आयजीएनसीए मधील हस्तलिखिते काळजीपूर्वक हलवणे, हे सर्वसाधारण काळातही अत्यंत आव्हानात्मक आणि जटिल काम आहे. त्यासाठी तपशीलवार नियोजन आणि आवश्यक ते कौशल्य असणाऱ्या

कर्मचाऱ्यांची गरज असेल. जगभरात कोठेही अशाप्रकारच्या वास्तू हलवताना या ऐतिहासिक वारशाच्या जपणुकीसाठी अत्यंत काळजी घेतली जाते, तज्ज्ञांशी सल्लामसलत केली जाते. यापैकी काहीही येथे झालेले नाही. नॅशनल म्युझियममधील कलाकृतींची परिपूर्ण यादीही अद्याप व्हायची आहे. येथील वस्तूंच्या हाताळणीत या वस्तूंची मोडतोड व तूटफूट होण्याच्या धोक्याकडेही या विशेषज्ञांनी लक्ष वेधले आहे.

सेंट्रल व्हिस्टा प्रकल्प घाईघाईने राबविला जात आहे हे स्पष्ट दिसत आहे. प्रकल्पाची कोणतीही सार्वजनिक तपासणी करण्याबाबत केंद्र सरकारचा नकार संशयास्पद आहे. आता तर या बांधकामांच्या छायाचित्रणासही बंदी घालण्यात आली आहे. सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पामुळे होणाऱ्या पुनर्विकासामधील होत असलेल्या विध्वंसाबाबत व्यक्त होणाऱ्या चिंतांना केंद्र सरकारने उत्तर देणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यानंतर राष्ट्रउभारणीच्या सुरवातीच्या काळात All India Institute of Medical Sciences – AIIMS सारखी सुसज्ज हॉस्पिटल्स उभारली गेली जी आजही उत्कृष्ट आरोग्यसेवा देत आहेत. अटलबिहारी बाजपेयींच्या काळात 6 AIIMS ची घोषणा करण्यात आली जी सर्वच्या सर्व मनमोहनसिंह यांच्या कार्यकाळात बांधली गेली. मोदी सरकारच्या काळात देशात 15 AIIMS ची घोषणा झाली परंतु त्यापैकी एकही पूर्ण झालेले नाही. सेंट्रल व्हिस्टाची मात्र सरकारला घाई झाली आहे!

कोरोना व्हायरसने कमी आणि आरोग्ययंत्रणेच्या अभावाने अधिक मृत्यू झाल्याचे आकडेवारी सांगते. इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) ने जीडीपीच्या ८ ते १० टक्के तरतूद आरोग्यसेवेसाठी करण्याची मागणी केली आहे. परंतु सरकारला सेंट्रल व्हिस्टा, बुलेट ट्रेन, पुतळे, यातच रस आहे.

देशाला आज अभूतपूर्व आरोग्य विषयक संकटाचा सामना करावा लागत आहे. त्याचे दुष्परिणाम आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही जाणवत आहेत. हा प्रकल्प आत्ता स्थगित करून, परिस्थिती जरा स्थिरस्थावर झाल्यावर, विरोधी पक्ष आणि जनतेला विश्वासात घेऊन पुढे गेल्यास सरकारचीच विश्वासार्हता वाढणार आहे.

संसदेसाठी नवीन इमारतीची आवश्यकता नक्कीच आहे आणि केंद्र सरकारच्या विद्यमान कार्यालयांची पुनर्रचना करण्याचीही गरज आहे. तथापि आत्ताच तो प्रकल्प पुढे रेटण्याची घाई पहाता त्यात गरज कमी आणि भव्यतेच्या हव्यासापायी आलेले झपाटलेपण जास्त आहे. सेंट्रल व्हिस्टा हे कोविड महामारीकडे सरकारने केलेल्या दुर्लक्षाचे आणि बेपवाईचेच स्मारक ठरू शकते! २०२४ मध्ये पुढच्या लोकसभा निवडणुकीपूर्वी हा प्रकल्प पूर्ण करण्याचा केंद्राचा निर्धार हा भारत सरकारच्या शासनधर्माच्या ऱ्हासाचे ढळढळीत उदाहरण आहे. लोकशाहीचे मंदिर मानली जाणारी संसद बांधताना लोकशाहीचा आत्मा असलेले लोकमत मात्र निर्णयप्रक्रियेतून गायब झालेले दिसते आहे.

* * *

ढासळती विश्वासार्हता!

'लसीशिवाय आपण कोरोनाचा पराभव केला आहे' असे पंतप्रधान मोदी ८ एप्रिल २०२१ ला म्हणाले तेव्हा कोरोना व्हायरस त्यांना खदाखदा हसला असेल. त्यानंतर देशात कोविडच्या दुसऱ्या लाटेने थैमान घातले तेव्हा देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री बंगालच्या निवडणुकीत मश्गुल होते. विनामास्क, विना सुरक्षित अंतर लाखोंच्या रॅलींसह निवडणुका पार पडल्या. लाखोंच्या भक्तीरसात कुंभमेळा पार पडला. देशात कोविडने हाहाकार माजवला तरी त्यांनी रवींद्रनाथांचा वेश उतरवला नव्हता. पाकिस्तान, बांगला देश, भूतानसारखे शेजारी देश मदतीला धावून येत होते तेव्हाही त्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव होत नव्हती. बांगलादेशने १०,००० रेमडीसीवर पाठवले आहेत तर भूतानने दररोज ४० मेट्रिक टन ऑक्सिजन! आपले लहान शेजारी देश भारताचा प्राण वाचवत होते आणि नरेंद्र मोदी दोन महिने प्रचारात व्यस्त होते!

जगाच्या कानाकोपऱ्यातून भारताला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर्स, व्हेंटिलेटर्स, रेमडीसीवर अशी मदत पाठवली जात आहे. मात्र ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर्स, सिलेंडर्स, कोरोनावरील औषध यावरील जीएसटी काही काळासाठी माफ करण्यासाठी वा कमी करण्यासाठीही केंद्र सरकार तयार नाही.

काही तथ्ये येथे मांडत आहे. त्यावर वेगळी टिप्पणी

करण्याची गरजच नाही. -

कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी १० दशलक्ष डॉलरची मदत भारतासाठी घोषित केली.

मात्र ती पीएम केअर्सला न देता त्यांनी रेडक्रॉसच्या सुपूर्द केली.

पॅट कमिन्स या क्रिकेट खेळाडूने पीएम केअर्स ला देणगी देण्याचा आपला निर्णय बदलून त्याऐवजी युनिसेफला भारतावर पैसे खर्च करण्यासाठी निधी दिला.

पीएम केअर्स हा खाजगी फंड आहे. कुठून किती पैसे आले ते कशावर खर्च झाले याची कसलीही माहिती उपलब्ध नाही. पंतप्रधानांची विश्वासार्हता अशा रीतीने संपूर्ण जगाला आता कळली आहे.

फिलिपाइन्स आणि न्यूझीलंडच्या दिल्लीतील परराष्ट्र कार्यालयांना ऑक्सिजन केंद्र सरकारने नव्हे तर काँग्रेसने पुरवले. मात्र ही मदत करणाऱ्या युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीनिवास यांनाच गुन्हेगार ठरवण्याचा प्रयत्न झाला. परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी तर, फिलिपाइन्स आणि न्यूझीलंडच्या परराष्ट्र कार्यालयांना ऑक्सीजनची गरजच नव्हती असे तारे तोडले. अखेर त्या देशांनीच आपण तशी विनंती काँग्रेसला केल्याचा खुलासा केला तेव्हा भाजपची बोलती बंद झाली. तिकडे श्रीनिवास मात्र 'ऑक्सिजन मॅन' झाले!

दिल्ली उच्च न्यायालयाने ऑक्सीजन पुरवण्यासंदर्भात दिलेले आदेश केंद्राने पाळलेले नाहीत. त्यावर, 'न्यायालयाचा अवमान' अंतर्गत कारवाई का करू नये, असा प्रश्न न्यायालयाने विचारला.

हॉस्पिटलला ऑक्सीजन न मिळाल्यामुळे कोरोना रुग्णांचा होणारा मृत्यू हा नरसंहारापेक्षा (Genocide) कमी नाही – अशी टिप्पणी अलाहाबाद उच्च न्यायालयाने केली.

राज्यांना ऑक्सीजन व रेमडीसीवर आदी औषधे वाटपातील केंद्र सरकारचा अकार्यक्षम, अपारदर्शी, पक्षपाती कारभार पाहून सर्वोच्च न्यायालयाने १२ सदस्यीय समिती नेमली.

देशाचा सगळाच कारभार न्यायालयाने चालवावा अशी वेळ मोदींनी आणली आहे.

कोविड रुग्णांसाठी ऑक्सीजन उपलब्ध व्हावा म्हणून इंडस्ट्रिअल ऑक्सिजनवर बंदी घालताना ऑक्सीजन सिलेंडरच्या निर्मितीवरही बंदी आणली गेली! १० दिवस ऑक्सीजनचे उत्पादन ठप्प राहिले!

७१ दिवसांमध्ये गुजरात सरकारने कोरोनामुळे ४२१८ मृत्यू झाले अशी सरकारी आकडेवारी दिली आहे. त्याच सरकारने त्याच ७१ दिवसांमध्ये १.२३ लाख मृत्यू दाखले दिले आहेत!

गंगेमध्ये हजारोंच्या संख्येने कोरोना रुग्णांची प्रेते वाहून आली.

पीएम केअर्स मधून खरेदी केलेल्या व्हेंटीलेटर्स चा दर्जा अतिशय खराब आहे त्यामुळे ते वापराविना पडून आहेत.

'मोदीजी, हमारे बच्चों की वॅक्सीन विदेश में क्यूं भेज दी?' - अशी पोस्टर्स लावली म्हणून दिल्लीमध्ये अमित शहांच्या आदेशाने २५ लोकांना अटक करण्यात आली!

आणि हद्द म्हणजे लसीबद्दल चालवलेला खेळखंडोबा!

कोरोनाच्या कहरात लस हेच एक जीवरक्षक उपलब्ध आहे असे असताना, आपल्या देशात जगाला पुरवठा करणारी सर्वाधिक लसनिर्मिती होत असताना, लसींसाठी ऑर्डरच देण्यात आली नाही. त्यानंतर ती प्राधान्याने आपल्यालाच मिळावी यासाठी कंपन्यांवर दबाव टाकण्यात आला. मध्येच एक लसोत्सव साजरा करण्यात आला. मग ६० वर्षांपुढील नागरिकांचे लसीकरण करण्याचा उपक्रम करण्यात आला. दरम्यान दुसऱ्या लाटेत तरुणांमध्येही कोरोनाचा प्रादुर्भाव, अत्यवस्थता, अनुषंगिक अन्य गंभीर आजार किंवा मृत्यू यांचे प्रमाण वाढल्यानंतर ४५-६०, १८-४४ वयोगटांच्या लसीकरणाचे निर्णय घेतले आणि फिरवले गेले. कोविशिल्डच्या दोन डोसमधील अंतर चार आठवड्यांवरून सहा, आठ, बारा आठवड्यांपर्यंत वाढवत नेले गेले. एक वेळ अशी आली की दुसरा डोस घेणाऱ्यांसाठी डोस उपलब्ध नाही. त्यांना डोस दिला तर पहिल्या डोससाठी रांगेत उभे राहिलेले उघड्यावर पडतात. ऑनलाईन, ऑफलाईन यंत्रणा फसलेल्या आणि त्यापायी येणारी घबराट, अस्वस्थता, भयग्रस्तता!

दरम्यान राज्य सरकारे लसींसाठी केंद्राकडे साकडे घालून बसली होती तरी केंद्र सरकारला ढीम्म नव्हते. लसींचा पुरवठा करण्याबाबतही सापत्नभाव केंद्राने दाखवलेलाच होता. शिवाय कंपन्यांकडून मिळणारा लससाठाही केंद्र सरकारला स्वस्त दराने

व राज्य सरकारांना जास्त दराने खरेदी करावा लागला. सर्व नागरिकांना मोफत लसीकरणाची तर घोषणाच राहिली. खासगी हॉस्पिटल्सना सर्वाधिक दराने लस विकत घ्यावी लागल्यामुळे त्यांच्याकडून ती महाग विकलीही गेली. या सर्वात मोफत लसींचा तुटवडा निर्माण झाला, याला जबाबदार कोण ?

अद्यापही केंद्र सरकार १८-४४ वयोगटासाठी लसी द्यायला तयार नाही, आणि कोविडची तिसरी लाट त्याहीखालच्या वयोगटापर्यंत पोहोचणार आहे अशी भयसूचक घंटा वाजत आहे. ही लाट बालकांपर्यंत पोहोचली तर त्यांच्या लसीकरणासाठी, उपचारांसाठी काय योजना, व्यवस्था आहे ? !

असा सर्व गडबडगुंडा झाल्यावर अखेर हा सगळा गुंता राज्यांकडे ढकलून केंद्र सरकार मोकळे झाले.

सिरम कंपनी केंद्राच्या ऑर्डरची पूर्तता करत आहे. त्यामुळे त्यांच्याकडे राज्यासाठी लसी उपलब्ध नाहीत. यावर 'ग्लोबल टेंडर' काढून परदेशातून लस खरेदी करण्याचा पर्याय राज्य सरकारांनी शोधला मात्र त्याला त्या कंपन्यांकडून मुळीच प्रतिसाद मिळाला नाही. आतातर फायझर, मॉडर्ना या आघाडीच्या कंपन्यांनी जाहीरपणे सांगितले कि आम्ही फक्त देशांच्या केंद्र सरकारबरोबरच व्यवहार करू. या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी सांगितले की कोणत्याही देशात लसीकरण हा राष्ट्रीय सरकारच्या अखत्यारीतला विषय राहिला आहे.

पुन्हा एकदा लसीकरणाचा यक्षप्रश्न उभा राहिला आहे !

अशा तऱ्हेने केंद्र सरकारने आपल्या बेजबाबदारपणाने सर्व देशाचा जीव टांगणीला लावलेला आहे !

सुनीती सु. र.
napm.suniti@gmail.com

(आदरांजली : पान ९ वरून)

गढवाल म्हणजे भागीरथीच्या परिसरात या आंदोलनाचा झेंडा १९७६ साली हाती घेतला. उत्तराखंड संघर्ष वाहिनी हा या आंदोलनातला तिसरा प्रभावी गट होता. दुर्दैवाने या तिन्ही गटांमध्ये वैमनस्य निर्माण झालं. त्यामुळे उत्तराखंड राज्याच्या मागणीच्या आंदोलनात यापैकी एकही गट अग्रभागी नव्हता. साहजिकच विकासाला नवी दिशा देण्यासाठी आवश्यक असणारं राजकारण उभं राह्यलं नाही. परिणामी उत्तराखंड राज्याच्या निर्मितीनंतर हिमालयाच्या पर्यावरणाला सुरुंग लावणाऱ्या प्रकल्पांची संख्या आणि गती वाढत गेलेली दिसते.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञान कमालीचं प्रगत झालं आहे आणि जग हवामान बदलाच्या संकटाचा सामना करत आहे. जागतिक तापमान वाढीमुळे हा हवामान बदल होतो आहे. हिमालयाच्या पर्वतरांगेमध्येही त्यामुळे तापमानात वाढ झाली आहे. गेल्या वर्षीच्या हिवाळ्यात तिथे बर्फवृष्टी कमी झाली. हिवाळ्यामध्ये जंगलांमध्ये वणवे पेटणं हे तापमान वाढीचं लक्षण आहे.


सूर्यापासून येणारी काही ऊर्जा जमीन व समुद्राच्या पाण्यात शोषली जाते आणि उर्वरित ऊर्जा अंतराळात फेकली जाते. पृथ्वीच्या वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड व अन्य वायूंचं प्रमाण वाढल्याने सूर्याची ऊर्जा अंतराळात फेकली जाण्याला अटकाव निर्माण झालाय, त्यामुळे जगाचं तापमान वाढतं आहे. औद्योगिक विकासामुळे ही समस्या उद्भवली आहे. ही बाब वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध केली पॉल क्रुटझन, मारियो मोलिना आणि एफ. शेरवुड रोलँण्ड या शास्त्रज्ञांनी. त्यासाठी या तिघांना १९९५ साली नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

नोबेल पुरस्काराचा स्वीकार करताना एफ. शेरवुड रोलँण्ड या शास्त्रज्ञाने आपल्या भाषणात म्हटलं, "what's the use of having developed a science well enough to make predictions if, in the end, all we are willing to do is stand around and wait for the them to come true?" (विज्ञानाची प्रगती एवढी झाली आहे की आपण भविष्याबद्दल अचूक भाकीत करू शकतो, परंतु आपण ती भाकीतं खरी होण्याचीच वाट पाहाणार असू तर त्याचा काय उपयोग आहे ?)

चिपको आंदोलन ७० च्या दशकात झालं. हवामान बदल वा जागतिक तापमानवाढीमुळे ओझोनच्या थराला पडलेल्या छिद्राच्या संशोधनाबद्दल १९९५ साली नोबेल पुरस्कार देण्यात आला.

२००८ साली सुंदरलाल बहुगुणा यांना पद्मविभूषण किताब देण्यात आला. मात्र आपण प्रस्थापित विनाशकारी विकासाचा पुनर्विचार करायला तयार नाही. शाश्वत विकासाचा मार्ग शोधण्याचीही आपली इच्छा नाही. परिणामी उंची वाढूनही हिमालयाचं भवितव्य अंध:कारमय आहे. सुंदरलाल बहुगुणा यांच्या निधनाचं दु:ख सोसण्याची शक्ती हिमालयाला मिळावी, ही प्रार्थना.

suniltambe07@gmail.com


MKCL
॥ ज्ञानदीप लावू जगी ॥
www.mkcl.org
चौथ्या औद्योगिक क्रांतीची ओळख
Machine Learning
Big Data
Augmented Reality
Robotics
MS-CIT
Virtual Reality
Internet of Things
3D Printing
Artificial Intelligence
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
उद्याच्या जगात
वावरण्याचा आत्मविश्वास !
कोर्स उपलब्ध:
केंद्रात / घरी
कंप्यूटरवर / स्मार्टफोनवर
प्रवेशासाठी www.mkcl.org/join या लिंकला भेट द्या
किंवा नजीकच्या MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

Marathi-Monthly - Andolan Shashwat Vikasasathi, Editor-Medha Patkar. Postal Regn. No. MCE/296/2021-23
RNI No. MAHMAR/2009/30128 Licence to Post without Prepayment No. MR/Tech WPP/East/358/2021-23
Date of Publication 1st of every month Date of Posting 1st of every month Posted at Dadar P.O. 400014.

(आघाडीवर : पान २७ वरून)

पाहिजे याकडे लक्ष वेधले. ''येणाऱ्या काळात सत्याग्रही, समाजवादी, लोकशाहीवादी विचारप्रवाहांना एकत्र आणण्याची सामुदायिक जबाबदारी आपल्यावर आहे. राजकारण हे कायमच आपल्या प्रयत्नांना छेद देणारं असणार आहे, आणि म्हणून हे काम वाटतं तितकं सोपं नाही. परंतु पुष्पा भावे आणि त्यांच्यासारख्या विचारवंतांच्या चिंतनातून ज्या समाजाचं चित्र उभं राहिलं त्या समाजाकडे वाटचाल करत राहणं हेच आपलं कर्तव्य आहे'' असं आग्रही प्रतिपादन बाबा आढाव यांनी केलं.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी सर्व वक्त्यांनी कथन केलेल्या आठवणींचा आढावा घेतला आणि त्यांनी मांडलेल्या संकल्पनांची पूर्तता करण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचा विश्वास व्यक्त केला. पुष्पाबाईंबद्दल बोलताना ते म्हणाले की, ''प्राध्यापक, नाट्य-साहित्य या वर्तुळात कार्यरत असणाऱ्या व्यक्तीचा चळवळी आणि आंदोलनांशी काय संबंध याचं उत्तर पुष्पाताईंनी आपल्या वागण्यातून दिलेलं होतं. कोणत्याही आंदोलनाची बातमी पोचायचा अवकाश, त्या तिथे उपस्थित राहून, कार्यकर्त्यांच्या जोडीला उभ्या राहिलेल्या असायच्या. मोठी माणसं किती साधी असतात याचा हा उत्तम वस्तुपाठ होता. सध्याचा काळ टोकाचा एकारलेपणा, असंवाद, अशा प्रवृत्तीचे सत्ताधारी असल्यामुळे अत्यंत आव्हानात्मक आहे, अशा वेळी नागरिक, विद्यार्थी, लेखक, कलावंत सर्वांनीच निर्भय बनणं हीच काळाची गरज आहे. पुष्पाताईंच्या स्वप्नातल्या समाजपर्यंत जाणारा रस्ता अधिकाधिक व्यापक, संवादी कसा होईल यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करत राहणं हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.''

अंधार पडायला लागला की खुज्या माणसांच्या सावल्या देखील लांब वाटू लागतात. दुर्दैवाने आजच्या तरुण पिढीला अशा खुज्या माणसांच्या सावल्यांतच आपले आदर्श शोधावे लागत आहेत. अशावेळी पुष्पा भावे : विचार आणि वारसा यासारख्या पुस्तकातून एका खऱ्याखुऱ्या उत्तुंग व्यक्तिमत्वाची भेट होणं तरुण मनांना समृद्ध करेल यात शंकाच नाही. सर्वसामान्य वाचकांच्या आयुष्यात पुष्पा भावे नावाच्या विजेचा लखलखीत स्पर्श घडवून आणल्याबद्दल साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक परिवाराचे मन:पूर्वक अभिनंदन आणि आभार !

kharerujuta@gmail.com

To,

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन - शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.
प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.